# मृत्यू नंतर काय? मृत्यू पूर्वी काय?




प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय

# विषय-सूची


| क्रम | विषय | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | मृत्यूनंतर काय ? (संपादकीय) | ३ |
| २ | मनुष्यात्मे काय पशु-पक्षी इत्यादी योनींत पुनर्जन्म घेतात ? | ५ |
| ३ | मृत्यूनंतर मनुष्यात्मा काय स्वर्गात वा नरकात किंवा परलोकात जातो ? | १६ |
| ४ | वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेले पुनर्जन्मविषयक वृत्तांत | २० |
| ५ | आत्म्यांच्या योनी-परिवर्तनाच्या प्रश्नावर एका नव्या दृष्टिकोनातून विचार | ३८ |
| ६ | देवता, दैत्य, असुर या काय वेगवेगळ्या योनी आहेत ? | ४६ |
| ७ | अमृताद्वारे मृत्यूवर विजय, अमरपदाची प्राप्ती | ५० |
| ८ | परमात्म्याकडून कोणते अमृत मिळते ? | ५३ |
| ९ | मृत्यूला कसे जिंकावे | ५४ |
| १० | मृत्यूनंतर प्रत्येक माणसाबरोबर जाते एक वळकटी व एक पोते | ५७ |
| ११ | मृत्यूपूर्वी काय ? | ६० |
| १२ | मग कराल तरी कधी ? | ६३ |

# १. मृत्यूनंतर काय ?

एक ना एक दिवस प्रत्येक माणसाला मरण हे येणारच. हे एक अटळ सत्य आहे. तेव्हा प्रश्न उद्‌भवतो की, मृत्यू काय आहे आणि मृत्यूनंतर काय होते ? हा प्रश्न प्रत्येक व्यक्तीने जाणण्यायोग्य आहे कारण मृत्यू किंवा काळ हा कोणावर कधी झडप घालील याचा नेम नाही. परंतु बरेच लोक या प्रश्नाचे उत्तर जाणण्यासाठी करावे तितके प्रयत्न करीत नाहीत. ते म्हणतात की, मरायचं तर आहेच, मेल्यानंतर काय व्हायचं ते होवो, त्यासाठी आताच विचार करण्याची काय गरज आहे ? तेआत्माबित्म्याच्या चर्चेला आजच्या परिस्थितीत व्यर्थ मानून पैसा, खाणे-पिणे व मजा मारणे, यांवरच अधिक विचार करतात.

या विषयात औत्सुक्य असणारेही बरेच लोक आहेत आणि या बाबतीत प्रचलित असलेल्या समजुतीही ते जाणतात परंतु मृत्यूनंतरच्या गतीविषयी मर्त्य मानवाने जे काही सांगितले आहे ते बरोबर आहे की नाही आणि जर बरोबर असेल तर ते कितपत बरोबर आहे अशा संभ्रमात ते पडलेले आहेत. अशा रीतीने ते जीवन आणि मृत्यूचे कोडे न सोडविता अर्धवट सोडून देतात आणि शेवटी एक दिवस त्यांना मृत्यू उचलून नेतो व त्यांचे आप्तमित्र त्यांच्याविषयी म्हणतात की, "आमचा हा नातलग वा मित्र स्वर्गाला गेला." कोठे आहे स्वर्ग, तो स्वर्गाला गेला हे आपण कसे जाणले, देहत्याग केल्यावर स्वर्गाला जाणारी वस्तू काय आहे वगैरे प्रश्नांची उत्तरे मात्र कोणीही देत नाही.

## प्रचलित समजुती

मृत्यूनंतरच्या गतीविषयी प्रचलित असलेल्या समजुतींपैकी एक अशी आहे की, वाईट कर्मे केलेली असली तर मनुष्यात्मा पशू, पक्षी, कीटक इत्यादी योनींत पुनर्जन्म घेऊन दुःख भोगतो आणि पुण्य कर्मे केलेली असली तर तो स्वर्गात सुख भोगतो. असेही एक मत आहे की, मृत्यूनंतर पुण्यात्मे परलोकास जातात किंवा ज्योतितत्वात लीन होतात आणि पापात्मे नरकात यातना भोगतात. काही संप्रदायांच्या मतानुसार मृत्यूनंतर माणूस कबरीत दाखल होतो. शेवटी जेव्हा प्रलय काळ (कयामत) येतो तेव्हा ईश्वर (खुदा) सर्व आत्म्यांना त्यांच्या

पापकर्मांबद्दल शिक्षा देऊन परत घेऊन जातो. आज बरेचसे लोक असेही मानतात की, आत्मा नावाची वेगळी अशी वस्तू नाही. मृत्यूनंतर मृत देहच तेवढा राहतो, बस ! प्रश्न उद्‌भवतो की, या गोष्टी काय खऱ्या आहेत ? यांपैकी कोणती गोष्ट कितपत खरी आहे ? आता आम्ही यांपैकी प्रत्येक समजूतीवर विचार करणार आहोत.

याविषयी विचार करताना आम्ही केवळ विवेकाचा आधार घेणार नसून 'काळांचाही काळ', त्रिकालदर्शी परमपिता परमात्म्याने जी रहस्ये उघड केली आहेत त्यांचाही आधार घेणार आहोत.

याव्यतिरिक्त वेळोवेळी वृत्तपत्रांत पुनर्जन्मासंबंधी जे वृत्तांत प्रसिद्ध झाले आहेत त्यांचाही अभ्यास करून खरे काय ते पाहणार आहोत. वृत्तपत्रांत जे वृत्तांत छापून आले आहेत त्यावरून मृत्यूपूर्वी माणसाच्या संस्कारांचे किंवा कर्मांचे एक खाते तयार होते व त्याचा परिणाम काय होतो हे कळून येते.

**संपादक**

# २. मनुष्यात्मे काय पशु-पक्षी इत्यादी योनींत पुनर्जन्म घेतात ?

**फा**र पूर्वीपासून भारतात ही समजूत चालत आलेली आहे की, मनुष्यात्म्याला आपल्या पापकर्मांचे फळ म्हणून पशु-पक्ष्यादी योनींतून भ्रमण करावे लागते. हे सिद्ध करण्यासाठी बहुधा तीन तर्क मांडण्यात येत असतात. त्यांपैकी एक एक घेऊन त्यावर आम्ही चर्चा करणार आहोत. तसेच इतर काही पुराव्यावरून हे स्पष्ट करणार आहोत की, मनुष्यात्मा वास्तविक पशू, पक्षी, कीटक इत्यादी योनींत पुनर्जन्म घेत नाही.

**पशु-पक्ष्यादी योनी काय मनुष्यात्म्याला सुधारण्यासाठी आहेत ?**

योनी-परिवर्तनाच्या सिद्धांताचा पुरस्कार करणारे लोक बहुधा हा एक युक्तिवाद नेहमी करीत असतात की, दयाळू व कृपाळू परमात्मा मनुष्यात्म्याला सुधारण्यासाठी त्याला पशु-पक्ष्यादी योनींत पाठवितो. ते म्हणतात की, "प्रत्येक देशाचे सरकार गुन्हेगारांना शासन करण्यासाठी तुरुंग तयार करते. गुन्हेगारांना गुन्हे करण्याचे स्वातंत्र्य मिळू नये व काही काळ गुन्हे करणे शक्य न झाल्याने त्यांना त्याचा विसर पडावा व अशा रीतीने त्यांनी गुन्हेगार-वृत्तीपासून आपली सुटका करून घेऊन सुधारावे असा हेतू त्यांना तुरुंगात ठेवण्यामागे असतो. उदाहरणार्थ, एखाद्या माणसाने चोरी किंवा खून केला तर त्याला काही वर्षे तुरुंगात एका कोठडीत बंदीवान व्हावे लागते. त्यामुळे तितकी वर्षे तो चोरीमारी करू शकत नाही. त्याचा शुभ परिणाम हा होतो की, चोरीमारीच्या वृत्तीचा वापर बराच काळ न केल्याने ती क्षीण होत जात नाहीशी होते व अशा रीतीने तो सुधारतो. याव्यतिरिक्त इतर लोकही चोरीमारी केल्यास तुरुंगाची हवा खावी लागते हे पाहिल्यावर त्या वाटेने न जाण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा जसे गुन्हेगाराला तुरुंगात टाकल्याने त्याच्यात व इतरांतही सुधारणा होते तसेच मनुष्यात्म्यांनाही पशुपक्ष्यादी योनींत जन्म मिळाल्याने ते सुधारतात आणि इतरांनाही आपण पापकर्मे केल्यास आपणांस मनुष्ययोनी सोडून हलक्या योनीत बंदीवान व्हावे लागले हे भय राहते." आता आपण या तर्कावर विचार करून तो बरोबर आहे का ते पाहू या.

## उपरोक्त तर्कावर विचार

गंभीरपूर्वक विचार केल्यावर आपणही मानाल की, खरे पाहता तुरुंगात जाऊन माणूस सुधारत नाही. उलट तेथे इतर गुन्हेगारांच्या संगतीत तो आणिकच वाईट गोष्टी शिकतो. तुरुंगाबाहेर माणसाला चांगल्या व वाईट दोन्हीही प्रकारच्या लोकांची संगत मिळू शकते आणि चांगल्या लोकांच्या संगतीमुळे तो सुधारण्याचीही शक्यता असते. परंतु तुरुंगात तर बहुधा गुन्हेगारच असतात आणि त्यांच्या संपर्कामुळे माणूस आणखीनच वाईट गोष्टी शिकतो. यामुळेच गुन्हेगार मनोवृत्तीच्या माणसाचे आई-वडील, भाऊ-बहिणी, मित्र इत्यादी तो तुरुंगात गेल्यास जास्तच बिघडून निर्लज्ज व पक्का गुन्हेगार होईल आणि मग त्याला सुधारणे अतिशय कठीण होऊन बसेल म्हणून तो वाईट असला तरी त्याची तुरुंगात रवानगी होऊ नये यासाठी प्रयत्न करतात. तुरुंगात गुन्हेगाराला शिक्षा ही होतेच परंतु त्याच्यात सुधारणा काही होत नाही हे सकारही मान्य करते. म्हणून आज सुधारलेल्या देशांत मानसशास्त्रीय, शैक्षणिक किंवा सांस्कृतिक उपायांनी तुरुंगात गुन्हेगारांची सुधारणा व्हावी म्हणून प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच सर्वांनाच हे मान्य आहे की; सुधारण्याचा सर्वश्रेष्ठ आणि प्रभावशाली मार्ग म्हणजे माणसाला कर्माचे ज्ञान देऊन त्याला शिस्तप्रिय बनविणे हाच आहे, एखाद्या ठिकाणी बंदिस्त करणे नव्हे. तुरुंगाबाहेर निदान शिक्षण, ज्ञान किंवा सुसंगतीद्वारे माणसाला सुधारण्याची संधी मिळू शकते परंतु तुरुंगात तशी ती मिळत नाही. पुष्कळदा आपण वर्तमानपत्रात वाचतो की, अमका एक खिसेकापू तुरुंगातून सुटताच परत कोणाचा तरी खिसा कापताना पुन्हा पकडला गेला. तेव्हा हे स्पष्टच आहे की, तुरुंगात गेल्याने माणसाच्या गुन्हेगारवृत्तीत काही सुधारणा होत नाही उलट तो जास्तच बिघडतो आणि काही माणसे तर 'तुरुंगाचे पक्षी' (Jail Bird) बनतात.

अगदी याचप्रकारे एखाद्या विकृतीमुळे किंवा वासनेमुळे मनुष्यात्म्याचा पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म झाला तर तो त्या योनीत बिघडेलच, सुधारणार नाही. उदाहरणार्थ, समजा एखाद्या माणसाची चोरी करण्याची मनोवृत्ती आहे. तो बहुधा चोरी करूनच आपले पोट भरतो. आता योनी-परिवर्तनाच्या सिद्धांतानुसार या

पापकर्मामुळे वा संस्कारामुळे त्याचा दुसरा जन्म मांजरात झाला असे समजू. कारण मांजर बहुधा चोरी करूनच खाते. तेव्हा मांजरात जन्म झाल्यामुळे त्या मनुष्यात्म्याचा चोरी करण्याचा संस्कार तर दृढच होईल, त्याच्यात सुधारणा काहीच होणार नाही. त्याची चोरी करण्याची वृत्ती नष्ट होणार नाही उलट ती जास्तच वापरात येईल. शिवाय मांजर-योनीत त्या मनुष्यात्म्याला सुधारण्यास आवश्यक अशी चांगली संगत किंवा शिकवण मिळूच शकणार नाही. सुसंगती व ज्ञान तर आत्म्याला मनुष्ययोनीतच मिळू शकते. म्हणून मांजर-योनीत तो सुधारणे केवळ अशक्यच. वाल्मीकेचेच उदाहरण घ्या. नारदाने चांगला उपदेश केला म्हणूनच ना तो सुधारला! लूटमारीच्या वृत्तीचे फळ म्हणून जर त्याचा वाघात जन्म झाला असता तर तो कसा सुधारला असता ?

**योनी-परिवर्तनाची समजूत निराधार**

आता काही लोक असे म्हणतील की, चोरवृत्तीच्या मनुष्यात्म्याचा जन्म मांजरात होईलच असे नाही, अन्य योनीतही होऊ शकेल ज्यात त्याला चोरी करावी लागणार नाही. ठीक आहे, समजा तो वाघात जन्म पावला मग तर आणखीनच वाईट झाले म्हणावयाचे. पूर्वी चोरीचा संस्कार होता, आता इतर प्राण्यांवर हल्ला करून त्यांना ठार मारण्याच्या हिंसात्मक संस्काराची त्यात भर पडली, म्हणजे ही दुर्गतीच झाली, सुधारणा नव्हे. कोणी मग म्हणतील की वाघात नव्हे, कबुतरात त्याचा जन्म होईल. चला, हेही मान्य करू. परंतु कबुतर फार भोळे असते. चोरवृत्तीचा व चलाख असलेल्या मनुष्यात्म्यात कबुतरात जन्म पावण्याइतपत भोळेपणा कोठून आला ? चोर तर शिपायाला येताना बघून पळ काढतो परंतु कबुतर मात्र मांजराला येताना बघून आपले डोळे मिटून घेते व समजते की, मांजर येतच नाही. कालपर्यंत जो चोर होता, तो आता असा बावळट कसा झाला ? शिवाय, कबुतर फार भित्रे असते. चोर तर पकडलेला असतानाही झोंबाझोंबी करून सुटण्याचा प्रयत्न करतो कारण त्याला शिक्षेचे भय वाटत असते. म्हणजे कबुतर झाल्याने चोरात भयाच्या संस्काराची भर पडेल. याला काय सुधारणा म्हणावयाची ? तेव्हा, एखादी व्यक्ती म्हणेल की, चोरी करणारा माणूस कोणत्या योनीत जन्म घेईल ते आम्हाला काय माहीत ? तर मग आम्ही विचारतो की, चोराचे योनी-परिवर्तन होईल हे आपण कसे मान्य केलेत ?

वास्तविक मनुष्ययोनीतच दुःख भोगावे लागते हे पाहून माणूस सुधारतो. "जसे गुन्हेगाराला तुरुंगात जावे लागते हे पाहिल्यावर इतर लोक गुन्हे करण्यापासून परावृत्त होतात तसेच पापकर्म करणाऱ्याला पशुपक्ष्यादी योनींत जन्म घ्यावा लागतो हे पाहून लोक सुधारतात व पापकर्मांपासून दूर राहतात." हा जो योनीपरिवर्तनाचा सिद्धांत मान्य असलेल्या लोकांचा तर्क आहे, त्यावर आता आपण विचार करू या. प्रथम हे लक्षात ठेवावयास हवे की, गुन्हेगाराला तुरुंगात जाताना इतर लोक प्रत्यक्ष पाहतात परंतु ते मनुष्यात्म्याला पशुपक्ष्यादी योनींत जन्म पावताना काही पाहू शकत नाहीत; म्हणून योनी-परिवर्तनाचा सिद्धांत माहीत असूनही त्यांना त्याचे विशेष भय वाटत नाही. उलट मनुष्य योनीतच पापकर्मांचे दुःखरूपी फळ पाहून त्यांना अधिक भय वाटते आणि ते अधिक सुधारतात. उदाहरणार्थ, जे कर्म केले असता रोग, अपघात, दंगा वा दुःख होते अशी केवळ शंका आली की, शहाणा माणूस या कर्मापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो. जर पापकर्माचे फळ म्हणून मनुष्ययोनीत दुःख भोगावे लागले नसते तर कदाचित माणूस कोणत्याच पापकर्माला घाबरला नसता. तेव्हा, खरे सांगावयाचे म्हणजे शहाणा माणूस लुळे, पांगळे, आंधळे, मुके, अत्यंत गरीब व दुःखी लोक पाहून पापकर्मांपासून दूर राहण्याची प्रेरणा घेऊ शकतो आणि सुधारू शकतो; पापकर्मांपासून सुरक्षित राहण्यासाठी त्याला योनी-परिवर्तनाचा सिद्धांत मानण्याची आवश्यकता नाही, कारण तो मनुष्ययोनीतच पशुपक्ष्यांहूनही अधिक दुःखी असलेली माणसे पाहत असतो. साहजिकच तो मनुष्ययोनीला कर्मयोनीच्याव्यतिरिक्त भोगयोनीही मानून आपल्या कर्मात सुधारणा करतो. तेव्हा, पशुपक्ष्यादी योनींत गेल्याने आत्म्याच्या दुष्ट प्रवृत्ती नष्ट होतात आणि ते पाहून इतर लोकही पापकर्मांपासून सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करतात या म्हणण्यात काही तथ्य नाही. त्यात तथ्य असते तर त्यावर विश्वास ठेवणारे कोटयवधी लोक आज निर्विकारी जीवन व्यतीत करून पूर्णपणे पवित्र राहिले असते. परंतु व्यवहारात आपणांस तसे काही आढळत नाही. एवढे मात्र खरे की, मानवी जीवनात माणसाला ज्या काही पापकर्मांमुळे दुःख भोगावे लागते ती कर्मे करताना लोक जरा कचरतातच हे आपण पाहतोच. दुसरे असेही पाहण्यात येते

की, लोक परमात्म्याला यमराज मानून त्याला थोडेफार घाबरूनच असतात आणि कर्म-फळ अटळ समजून पापकर्मांपासून सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करतात.

**पशुपक्ष्यादी योनींत मनुष्यात्मा काय शिक्षा भोगण्यासाठी जातो ?**

योनी-परिवर्तन मानणारे लोक नेहमी दुसरा हा एक युक्तिवाद पुढे करीत असतात की, जसे एखाद्या देशाचे सरकार गुन्हेगाराला तुरुंगात बंदीस्त करून शिक्षा देते, तसेच साऱ्या जगाचा शास्ता जो परमपिता परमात्मा तो सुद्धा मनुष्यात्म्यांना त्याच्या पापकर्मांबद्दल शिक्षा म्हणून पशुपक्ष्यादी योनींत धाडतो. अशा प्रकारे, ते पशुपक्ष्यादी योनींना मनुष्यात्म्याला सुधारण्याचे साधन या व्यतिरिक्त शिक्षा भोगण्याची एक आवश्यक योजनाही मानतात. परंतु विचारांती आपण मानाल की, जर आत्मा मनुष्ययोनीतही शिक्षा भोगत असतो तर मग त्याला पशुपक्ष्यादी योनींत जाण्याची काय आवश्यकता आहे ? समजा एखादा माणूस दुसऱ्यांचा तिरस्कार करतो, त्याच्याकडे जाणाऱ्या लोकांना धुडकावून लावतो आणि तसाही तो लोकांशी नीटपणे वागत नाही, योनी-परिवर्तनाचा सिद्धांत मानणारे लोक म्हणतील की, असा माणूस कुत्र्याच्या योनीत पुनर्जन्म घेतो आणि कुत्र्याच्या रूपात तो जेव्हा भाकरीसाठी घराधरांतून फिरतो तेव्हा लोक त्याचा तिरस्कार करतात. तसेच धुडकावून व फटकावून त्याला आपल्या दारातून हाकून लावतात आणि तो गल्ली-बोळात पडून राहतो. शेवटी एक दिवस रस्त्यातच कोठेतरी मरतो. परंतु आपण असेही पाहतो की, एक अत्यंत गरीब आणि कुरूप माणूस जेव्हा लाचारपणे घराधरांतून मूठभर धान्यासाठी भिक्षा मागत फिरतो तेव्हा त्याचीही दोन चार कटू शब्दांनी संभावना करून लोक त्याला आपल्या दारासमोरून हाकलून लावतात आणि तो बिचारा शे-दोनशे घरांपुढे जाऊन हात पसरल्यावर आणि लोकांचे शिव्याशाप ऐकून व प्रसंगी धक्के-बुक्केही खाऊन झाल्यावरच आपले पोट कसे बसे भरतो.

तेव्हा माणूस असूनही तिरस्कार व मानखंडना त्याला सहन करावी लागते. कुत्र्याच्या जिण्यापेक्षाही हे जिणे खरोखरच अधिक लाजिरवाणे आहे कारण माणसात कुत्र्यापेक्षा जास्त स्वमान, स्वाभिमान व अनुभव-शक्ती असते. तो भिकारीही फळ्यापायऱ्यांवर पडून राहतो आणि शेवटी रस्त्याच्या कडेने थंडीने

काकडत, गरमीने लाही लाही होऊन व भुकेने व्याकूळ होऊन किंवा रोगग्रस्त व क्षीण होऊन मरतो. तेव्हा, पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म घेऊन जर मनुष्यात्म्याला जे दुःख होऊ शकते त्यापेक्षा किती तरी अधिक हर प्रकारचे दुःख त्याला मनुष्ययोनीतच भोगावे लागते तर पशुपक्ष्यादी योनींत मनुष्यात्म्याला शिक्षा भोगण्यासाठी जावे लागते असे का मानावे ?

## पशुपक्ष्यादी योनींत जर शिक्षा मिळत असेल तर न्यायालयांची काय जरूरी आहे ?

विचार करण्याजोगी गोष्ट आहे की, पशुपक्ष्यादी योनी जर मनुष्यात्म्याला शिक्षा भोगण्यासाठी आहेत तर जगात न्यायालयांद्वारे शिक्षा देण्याची व्यवस्था का करण्यात येते ? प्रत्येक देशाच्या शासनाने असा विचार करावयास हवा की, हरेक माणूस आपल्या पापकर्मांमुळे पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म पावून दुःख भोगेलच; तेव्हा गुन्हेगाराला याच मनुष्यजन्मात शिक्षा देण्याची व्यवस्था करण्याची काय आवश्यकता आहे ? लोकांनाही वाटले पाहिजे की, वकिलांना मोठी फी देऊन तसेच न्यायालयांचीही स्टँप् फी वगैरे भरून न्याय मागण्याची काय गरज आहे ? जो माणूस अन्याय करील तो पुढील जन्मात घोडा-गाढव, कुत्रा-मांजर, घार-घुबड, कावळा-चिमणी, साप-सरडा, किडा-मुंगी वगैरे होईलच. तेव्हा आपण न्याय मागण्याचे कष्ट का घ्यावेत ? जर एका देशातील लोकांनी दुसऱ्या देशतील लोकांवर आक्रमण केले तर योनी-परिवर्तनाचा सिद्धांत मानणारे लोक त्या दुसऱ्या देशातील लोकांना असे सांगू शकतील का की करू द्या त्यांना आक्रमण. ते सर्व आक्रमक पुढील जन्मात पशुपक्षी होऊन लाचार जिणे जगतील. आता त्यांच्याशी युद्ध करून आपले जन व धन का गमावता ? परंतु जगात असा विचार करीत असलेला कोणी आढळत नाही तसेच आजकालचे हिंसक व पापी मनोवृत्तीचे लोक पशुपक्षी होत असलेलेही दिसून येत नाही. जर योनी-परिवर्तनाचा सिद्धांत खरा असता तर आज सारे जग पशुपक्ष्यांनीच भरून गेले असते आणि माणूस दृष्टीसच पडला नसता कारण सारी माणसे दुसऱ्या जन्मी पशुपक्षी बनले असते.

## प्राकृतिक आपदा का ?

लक्ष देण्यायोग्य गोष्ट आहे की जगात महापूर, अतिवृष्टी, अवर्षणे, दुर्भिक्ष, भूकंप, वणवे इत्यादी प्राकृतिक प्रकोपांमुळे जे दुःख माणसाला भोगावे लागते ते कोणत्या योजनेनुसार आहे ? जर मनुष्यात्म्यांना सुधारण्यासाठी व शिक्षा भोगण्यासाठी पशुपक्ष्यादी योनींची व्यवस्था करण्यात आलेली आहे तर या आपदा का येतात ? यावरून स्पष्ट होते की, मनुष्यात्म्याला मनुष्ययोनीतच सुखदुःख मिळण्याचा नियम आहे आणि योनी-परिवर्तनाचा सिद्धांत निरर्थक आहे. माणूस जेव्हा कधी पापकर्म करतो तेव्हा त्याचे विशेष फळ त्याला कालांतराने मनुष्ययोनीतच मिळते परंतु अशांतीचा थोडा-फार अनुभव मात्र त्याला लगेच येतो. म्हणून योनी-परिवर्तनाची समजूत निराधार व अनावश्यक आहे.

## पशुपक्ष्यांद्वारे माणसाला सुख-दुःख

पशू, पक्षी, कीटक इत्यादींद्वारेही माणसाला दुःख होते असेही आपल्याला आढळून येईल. उदाहरणार्थ, एखादा पिसाळलेला कुत्रा किंवा विषारी साप चावला असता माणूस मृत्यू पावतो. उंदीर माणसाचे कपडे कुरतडतो व अन्न-धान्याची नासाडी करतो. मांजर घरातील दूध चोरून पिते. वाघ-सिंह इत्यादी हिंस्र पशू माणसाला मारून खातात. कावळे माणसाने उन्हात वाळत घातलेले पदार्थ पसार करतात. पाखरे व टोळ माणसाच्या शेतातील धान्य खाऊन फस्त करतात. माणसाला चावून डास हैराण तर करतातच शिवाय त्याला मलेरियाचाही रोगी बनवितात. ही झाली पशु, पक्षी, कीटक इत्यादींपासून माणसाला दुःख पोहोचण्याची गोष्ट. परंतु माणसाला त्यांच्यापासून सुखही मिळते. घोडा, गाढव, हत्ती, उंट इत्यादी माणूस व त्याचे सामान वाहून नेण्याचे काम करतात. बैल खटारा व नांगर ओढतो. गायी-म्हशी वगैरे गूरे दूध देतात. कुत्रा घराची व गुरांची राखण करतो. मांजर घरातील उदरांना मारून कपडे-लत्ते व अन्नधान्याचे संरक्षण करते. मासे पाणी स्वच्छ ठेवतात. मोर नाचून व पक्षी मंजूळ गाऊन मनोरंजन करतात. रेशमाचे किडे माणसाला रेशीम देतात तर मधमाशी मध देते. साप उंदीर, बेडूक, किडे इत्यादी खाऊन शेतात उगवलेल्या पिकाचे रक्षण करतात. तेव्हा, 'पशुपक्ष्यादी योनी ह्या माणसासाठी भोग-योनी आहेत' या म्हणण्याचा खरा अर्थ

असा आहे की, माणसाला जसा प्रकृतीद्वारे सुखदुःखाचा भोग मिळतो तसाच तो पशुपक्षी इत्यादींद्वारेही मिळतो. परंतु मनुष्यात्मा स्वतः पुनर्जन्म घेऊन पशुपक्ष्यादी योनींत दुःखरूप शिक्षा भोगण्यासाठी जातो असा त्याचा अर्थ मानणे अर्थातच चुकीचे आहे.

### 'अंते या मतिः सा एव गतिः' यानुसार मनुष्यात्मा काय पशुपक्ष्यादी योनींत जन्म घेतो ?

मृत्यूसमयी माणसाची जशी स्मृती, वृत्ती किंवा वासना असेल तशीच योनी त्याला पुढील जन्मी मिळते असा तिसरा मुख्य तर्क योनी-परिवर्तनाचा सिद्धांत मानणारे लोक बहुधा मांडीत असतात. ते म्हणतात की, "जर एखाद्या माणसाची अंतसमयीची वृत्ती वा वासना हिंसाप्रधान असेल तर त्याला कोणत्या तरी हिंस्र पशुयोनीतच जन्मास यावे लागेल. त्याचप्रमाणे, जर एखादा माणूस कंजूष असेल, कोणाला धन दान करीत नसेल आणि स्वतःसाठीही त्याचा उपयोग करीत नसेल, केवळ आपली तिजोरी राखत बसणारा असेल तर तो पुढील जन्मी साप होऊन जमिनीत गाडलेल्या व धनाने भरलेल्या हुंड्यावर जाऊन बसेल. तात्पर्य, माणसाचा जसा स्वभाव, संस्कार अथवा वासना असेल त्याप्रमाणे तो पुढील जन्मी तशी योनी व देह धारण करतो." आता हा तर्क कितपत बरोबर आहे यावर आपण विचार करू या.

### एक प्रश्न

आता क्षणभर आपण धरून चालू की, संस्कारानुसार मनुष्यात्मा पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म घेतो, मग प्रश्न हा आहे की, मनुष्यात्म्यांहून मूलतःच भिन्न असणारे पशुपक्ष्यादी योनींचे संस्कार मानवी देहाचा त्याग करणाऱ्या व पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म पावणाऱ्या मनुष्यात्म्यात कोठून येतात ? उदाहरणार्थ, समजा एक मनुष्यात्मा आपल्या एखाद्या निकृष्ट संस्कार वा स्वभावामुळे उंट किंवा वाघाच्या योनीत पुनर्जन्मास आलेला आहे परंतु प्रश्न उद्भवतो की, मानवी देहाचा त्याग करून उंट किंवा वाघाच्या योनीत जन्मणाऱ्या या मनुष्यात्म्यात उंटाप्रमाणे काटे खाण्याचा किंवा वाघाप्रमाणे माणसाला मारून खाण्याचा संस्कार, तसेच उंटाची व वाघाची अन्य वैशिष्ट्ये कोठून येतात ? याचे

उत्तर म्हणून योनी-परिवर्तनाचा सिद्धांत मानणारे लोक म्हणतात की, "आत्मा अनादी असून पूर्वी त्याने अगणित वेळा मनुष्याहून भिन्न अशा इतर योनींत जनम-पुनर्जन्म घेतलेला असतो त्यामुळे सर्व योनींचे संस्कार किंवा वासना त्याच्यात असतात आणि जेव्हा तो देह ठेवतो तेव्हा त्याच्यां अंतिम वासनेनुसारच त्याला पुढील जन्मी दुसरा देह मिळतो व त्या योनीप्रमाणे त्यात पूर्वीचे सुप्त असणारे संस्कार फिरून जागृत होतात." त्यांच्या म्हणण्याचा अर्थ असा की, जो मनुष्यात्मा मानवी देह टाकून उंट, वाघ किंवा मांजराचे शरीर धारण करील तो पूर्वीही कित्येक वेळा त्या योनीत जन्म पावलेला असल्यामुळे तिचे संस्कार त्यात असतील व ते आता जागृत होतील. आता आपणच पाहा की, मनुष्यात्मा पशुपक्ष्यादी योनीत पुनर्जन्म पावतो हीच गोष्ट तर त्यांना सिद्ध करावयाची होती. ती सिद्ध करण्याआधीच मनुष्यात्मा पूर्वीही उंट, वाघ इत्यादी योनींत जन्म पावलेला आहे असे मानणे अगदीच चूक आहे. म्हणजे हे असाध्य कोटीच्या गोष्टीलाच सिद्ध समजण्याची चूक करणे होय. अशा प्रकारे मनुष्यात्म्याच्या योनी-परिवर्तनाची समजूत कोणत्याच तर्काने सत्य सिद्ध होत नाही हे आपणास दिसून येईल.

अंतसमयी जो माणूस पशू, पक्षी इत्यादींच्या स्मृतीत राहतो (जसे राजा भरतृहरीला हरिण आठवले होते) तो आपल्या देहत्यागानंतर त्या योनींत पुनर्जन्म घेतो हे जर खरे असेल तर तसे मानणाऱ्या माणसाचे नुकसान होईल कारण अंत समयीसुद्धा त्याला हाच विचार येईल की, "कोणास ठाऊक कदाचित मीही एखाद्या पशुयोनीत जन्मास येईल," आणि अशा आपल्या संकल्पामुळे तो त्या पशुयोनीत जाईल. जो हा सिद्धान्त मानत नसेल त्याला अंतसमयी पशुपक्ष्यादी योनींत जाण्याचा विचारच येणार नाही आणि त्या योनींत तो पुनर्जन्म घेणार नाही.

## मनुष्यात्मे पशुपक्ष्यादी योनींत काय शिक्षा भोगतात ?

मनुष्यात्मा पशुपक्ष्यादी योनींत शिक्षा भोगण्यासाठी पुनर्जन्म घेतो असे जे लोक मानतात ते आपले हे मत सिद्ध करण्यासाठी बहुधा दोन गोष्टी मांडतात हे आम्ही सांगितलेच आहे. पहिली गोष्टी ही की, माणूस आयुष्यभर जी चांगली

किंवा वाईट कर्मे करीत असतो त्या कर्मांनुसार त्याचे चांगले किंवा वाईट संस्कार बनतात आणि त्या संस्कारांप्रमाणे आत्मा एखादी योनी पुढील जन्मी धारण करतो. उदाहरणार्थ ते म्हणतात की, जर एखादा माणूस कामुक असेल तर तो कुत्र्याच्या योनीत पुनर्जन्म घेतो कारण कुत्र्यात कामवृत्ती प्रधान असते. दुसरी गोष्ट अशी की, वाईट कर्मे करणाऱ्या माणसाला जसे सरकार तुरुंगात टाकते आणि त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेते किंवा अन्य एखाद्या रीतीने त्याला सुख-सामग्रीपासून वंचित करून त्याला शिक्षा देते तसेच वाईट कर्मे करणाऱ्या माणसाला आपल्या वाईट कर्मांची शिक्षा भोगण्यासाठी पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म घ्यावा लागतो आणि पारतंत्र्यात पडावे लागते. उदाहरणार्थ, कुत्र्याच्या योनीत जन्म घेऊन तो घरोघरी फिरतो तेव्हा लोक दरवाजा बंद करतात व त्याला पळवून लावतात. परंतु हे दोन्ही तर्क काय बरोबर आहेत ?

कामवृत्तीमुळे कामुक माणूस कुत्र्याच्या योनीत पुनर्जन्म याला पुरावा काय आहे ? आत्मा एक मानवी देह सोडल्यानंतरच आपले संस्कार अथवा आपली कामवृत्ती तर आपल्याबरोबर घेऊन जातो, परंतु तो दुसरा जन्मही मनुष्ययोनीतच घेतो असे आपण का मानू नये ? **कारण कामवृत्तीबरोबर त्या आत्म्यासह मनुष्य-वृत्तीही (माणसासारखा स्वभाव) जाते आणि त्याची कामवासनासुद्धा स्त्री किंवा पुरुष देहाशीच संबंधित असते, अन्य एखाद्या योनीशी नव्हे. याव्यतिरिक्त, तसे पाहिल्यास कोट्यवधी लोक आज कुत्र्यापेक्षाही जास्त कामुक आहे.** सांप्रत माणसाच्या दृष्टीत व वृत्तीत कामविकाराने ठाम ठाण मांडलेले आहे. कामवासना उपभोगण्यासाठी त्याने अनेक संबंध व साधने निर्माण केलेली आहेत आणि हा विषय म्हणजे तो आपला एक वैयक्तिक, मुख्य व कायदेशीर अधिकार (conjugal right) समजतो आणि त्याला रीतिरिवाज नव्हे तर कर्तव्य व नैसर्गिक गरज मानतो. असा हा कामविकार माणसाला आज स्वप्नातही सतावीत आहे. म्हणून मृत्यूसमयी या विकाराच्या प्राधान्यामुळे तो नंतरही एका कामुक माणसाच्या रूपात जन्म घेऊ शकतो, कुत्र्याच्या योनीत त्याचा जन्म मानणे हे काही तर्कयुक्त नाही.

आता दुसरी गोष्ट जी सांगितली आहे की, मनुष्ययोनी ही कर्मयोनी आहे आणि पशुयोनी ही भोगयोनी आहे व शिक्षा भोगण्यासाठी मनुष्यात्म्याला पशुयोनी प्राप्त होते हीसुद्धा विवेकयुक्त नाही, कारण तो शिक्षा मनुष्ययोनीतही भोगत असतो. उलट आपण असे पाहतो की, कित्येक कुत्रे मोठ्या चांगल्या बंगल्यात राहतात, मोटारीतून फिरतात, पाव-बिस्किटे खातात, त्यांची देखभाल करण्यासाठी नोकरही ठेवलेले असतात, त्यांचे मालक त्यांच्यावर फार प्रेम करतात आणि थोडेसे जरी आजारी पडले तर त्यांच्या औषधपाण्यावर बराच खर्च करतात. तर एक भिकारी माणूस थंडी-पावसात रस्त्यावर किंवा फुटपाथवर कशीबशी रात्र काढतो, भाकरीच्या एक-एक तुकड्यासाठी घरोघरी त्याला भीक मागावी लागते आणि भुकेबरोबर त्या लोकांचा उपहासही सहन करावा लागतो. याव्यतिरिक्त, माणसात पशुपक्ष्यांपेक्षा अधिक बुद्धी असल्याने त्याला दुःखाची जाणीव अधिक होते. एखाद्या पशूला दांडक्याने मारल्यास जेवढे दुःख होते तेवढे माणसाला दहावीस लोकांच्या उपस्थितीत काही अपमानकारक शब्द ऐकल्याने होते. तेव्हा, आपल्या वाईट कर्मांचे फळ म्हणून भोगण्यासाठी माणसाने पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म घेणे हे काही विवेकयुक्त नाही कारण मनुष्ययोनीतच माणूस आंधळा, बहिरा, मुका, लुळा, रोगी, निर्धन इत्यादी होऊन अधिक दुःख भोगतो.

# ३. मृत्यूनंतर मनुष्यात्मा काय स्वर्गात वा नरकात किंवा परलोकात जातो ?

**आ**ज कोणीही माणूस मृत्यू पावला की तो स्वर्गवासी झाला असेच बहुधा म्हणण्यात येते. परंतु असे म्हणणारे लोक शोक करतात, रडतात-भेकतातही आणि त्याला शांती दे अशी भगवंताची प्रार्थनाही करतात. त्याचा आत्मा भटकू नये म्हणून ते घरात दिवाही तेवत ठेवतात आणि दरवर्षी त्याचे श्राद्धही करतात. प्रश्न उद्‌भवतो की, तो आत्मा स्वर्गात गेला अशी त्यांची खरोखरच श्रद्धा असेल तर त्याच्यासाठी ते का रडतात, त्याला या मर्त्यलोकातील नीरस पदार्थ खाऊ घालण्याचे विविध यत्नही का करतात?

मृत्यूनंतर जर सर्व मनुष्यात्मे स्वर्गात जाते तर तेथेही भरमसाट वाढलेल्या लोकसंख्येची समस्या उभी राहली असती आणि आजकालचे आसुरी संस्कारांचे आत्मे तेथे जात राहिले असते तर स्वर्गातही या मृत्यूलोकांप्रमाणे तंटे-बखेडे, विषय-विकार, रडणे-पिटणे यांना ऊत आला असता आणि तो स्वर्गही स्वर्ग न राहता नरकच झाला असता. आज माणूस-माणुसकीला पारखा झालेला आहे आणि स्वर्गात जाण्याचा अधिकार तर फक्त दैवी-स्वभावाच्या माणसालाच आहे. तेव्हा विश्वास ठेवा की, सर्व लोकांचे कर्मबंधन याच मृत्यूलोकातील माणसाशी निगडीत असल्याने ते पुन्हा पुन्हा याच जगात मनुष्य-जन्म घेऊन सुखदुःख भोगत राहतात.

स्वर्ग आणि नरक आहेत ती कुठे ? वास्तविक सुख संपन्न जगाला 'स्वर्ग' आणि दुःखमय जगाला नरक म्हटले जाते. स्वर्ग काही पृथ्वीच्या वर आकाशात कोठेतरी आणि नरक पृथ्वीच्या वर आकाशात कोठेतरी आणि नरक पृथ्वीच्या खाली पाताळात नाही. उलट सत्य व त्रेता या युगांतील लोक व इतर प्राणीमात्र सात्विक वृत्तीचे असल्याने हीच सृष्टी स्वर्ग असते आणि सर्व स्त्री-पुरुष दिव्य गुणांनी युक्त व पवित्र, असल्याने देवी-देवता म्हटले जातात तर द्वापर व कलियुगांत लोक आसुरी वृत्तीचे, पतित, विकारी, भ्रष्टाचारी असतात म्हणून हीच सृष्टी नरक बनते. तेव्हा आज कोणी मृत्यू पावला तर तो स्वर्गात गेला असे

आपल्याला म्हणता येणार नाही कारण सर्व लोक एका शरीराचा त्याग केल्यानंतर याच मनुष्यलोकी पुनर्जन्म घेत राहतात. सुख वा दुःख याच लोकी असते. जेव्हा मनुष्यात्मा दैवी वृत्तीचा बनेल, सर्व कर्मबंधनांतून मुक्त होईल आणि परमात्मा सत्ययुगी सृष्टीची स्थापना करील तेव्हाच तो स्वर्ग अर्थात सत्ययुगी सृष्टीत जाऊ शकेल.

## मृत्यूनंतर मनुष्यात्मा काय परलोकात जातो ?

जेव्हा परमपिता परमात्म्याच्या मार्गदर्शनानुसार वागून मनुष्यात्मे आपली कर्मबंधने तोडून टाकतील अथवा पूर्व-जन्मींची पापे दग्ध करतील व अशा रीतीने ते आपले संस्कार पवित्र करतील तेव्हाच ते परलोकीही जातील.

हे सर्व काही कलियुगाच्या अंतीच घडते. त्या वेळी मनुष्यात्मे पशुंपेक्षाही अधिक विकारी व पतित झालेले असतात. धर्म-कर्म सर्व नष्ट झालेला असतो. माणसाचे खाणे-पिणे व वागणे सर्व काही तमःप्रधान झालेले असते. अशावेळी सर्व शक्तिमान, पतितपावन, कल्याणकारी, परमपिता शिव परमात्मा या सृष्टीवर अवतरित होऊन मनुष्यात्म्यांना आत्मा काय आहे, तो या सृष्टीवर येऊन किती पुनर्जन्म घेतो, परलोक कोठे आहे, स्वर्ग व नरक कोणाला म्हणतात, माणसाची कर्मे कशी व्हावयास हवीत आणि पापे (विकर्म) दग्ध करण्याचा पुरुषार्थ कोणता आहे ही सारी रहस्ये नीट समजावून सांगतो. परमपिता शिव परमात्मा प्रजापिता ब्रह्म्याद्वारे ज्ञान देऊन व योग शिकवून माणसाला देवता बनवितो आणि अशा रीतीने पुन्हा सत्ययुगी देव-सृष्टीची अर्थात स्वर्गाची स्थापना करवितो तसेच महादेव शंकराद्वारे वैज्ञानिकांना व अज्ञानी तथा गर्विष्ट लोकांना प्रेरणा देऊन कलियुगी, दुःखी सृष्टीचा अर्थात नरकाचा महाविनाशही घडवून आणतो. तेव्हा सर्व आत्मे महामृत्युमुळे (महाविनाश) परलोकी ज्योतितत्त्वात जाऊन निर्वाणावस्थेत (मुक्ती अवस्थेत) निवास करतात (लीन होत नाहीत कारण आत्मे अविनाशी आहेत) आणि तेथे जाण्यापूर्वी ते यमपुरीत आपल्या बाकी राहिलेल्या पापांचे क्षालन करण्याकरिता फार कडक शिक्षा भोगतात. सृष्टीच्या महाविनाशापूर्वी म्हणजे परमपिता शिव परमात्म्याचे अवतरण होऊन त्याने मार्गदर्शन करण्यापूर्वी कोणताही मनुष्यात्मा कर्मबंधनातून मुक्त होऊ शकत

नाही आणि त्यामुळे त्याला परलोकात व स्वर्गातही प्रवेश करता येत नाही. म्हणूनच 'मुक्तिदाता', 'सुखदाता', 'सद्‌गतिदाता', 'मार्गदर्शक' इत्यादी शब्दांनी केलेला केवळ परमात्म्याचाच महिमा प्रसिद्ध आहे, कोण्या मनुष्याचा नव्हे.

## मृत्यूनंतर माणूस काय कबरीतच पडून राहतो ?

काही लोक माणसाच्या मृत्यूनंतर त्याचे शव कबरीत पुरतात (दफन). त्याचे शव तर कबरीतच पडून राहते परंतु आत्म्याबाबत असे कसे म्हणता येईल की तोही कबरीत पडून राहतो? आत्मा तर आपल्या बऱ्या-वाईट कर्मांनुसार मनुष्ययोनीतच पुनर्जन्म घेऊन सुख किंवा दुःख भोगतो. जर मनुष्यात्मे परलोकातून (अलिम-ए-अरवाह अर्थात आत्म्यांचे जग अथवा ब्रह्मलोक) येऊन येथे केवळ एकच जन्म घेऊन नंतर महाविनाशापर्यंत (कयामत) कबरीतच पडून राहिले असते तर एखाद्या माणसाने सुखी आणि दुसऱ्या एखाद्या माणसाने दुःखी होण्याचे काहीच कारण नव्हते. एका मनुष्यात्म्याने एखाद्या गरीब व दलित कुटुंबात जन्म घेणे आणि दुसऱ्याने कोण्या श्रीमंत, धार्मिक व सुशिक्षित कुटुंबात जन्म घेणे हेच सिद्ध करते की, शरीर धारण करणाऱ्या आत्म्याचे पूर्व जन्माचेही काही कर्मखाते असते म्हणजे त्याने पूर्वी काही कर्मे केलेली आहेत आणि जन्म घेतलेला आहे व त्या आधारेच त्याचा हा जन्म झालेला आहे. या व्यतिरिक्त आजपर्यंत अनेक मुलांमुलींनी आपल्या पूर्व-जन्मांचा काही वृत्तांत सांगितला आहे, यावरूनही सिद्ध होते की, मृत्यूनंतर पुनर्जन्म जरूर होतो.

## आता येणाऱ्या मृत्यूनंतर काय होईल ?

उपरोक्त गोष्टींवरून स्पष्टच होते की, जन्म-जन्मांतर मनुष्यात्मे या लोकीच पुनर्जन्म घेत पूर्णपणे सुख-दुःख भोगत आलेले आहेत. परंतु आता पुन्हा या सृष्टीच्या महाविनाशाची सामग्री जय्यत तयार होऊन बसलेली आहे. परमपिता शिव परमात्म्याने महादेव शंकराद्वारे वैज्ञानिकांना प्रेरणा देऊन अणू व हायड्रोजन बॉंब तयार करविले आहेत आणि देहाभिमानी लोकांची वृत्तीही गृहयुद्ध करण्यास सिद्ध झालेली आहे तसेच पापांमुळे प्रकृतीही प्रकोप करण्यास उद्युक्त झालेली आहे. तेव्हा, हा जो महामृत्यू किंवा अंतिम मृत्यू येईल तत्पूर्वी जे लोक परमात्म्याने प्रजापिता ब्रह्म्याद्वारे दिलेले ईश्वरी ज्ञान व शिकविलेला सहज

राजयोग प्रत्यक्षात जीवनात आचरून दिव्य स्वभावी व कर्मातीत होतील. ते परलोकात मुक्ती आणि नंतर सत्ययुगी सृष्टीत (स्वर्गात) पूर्ण सुखाची प्राप्ती करून घेतील. इतर सर्व मनुष्यात्मे यमपुरीत कडक शिक्षा भोगून काही काळ परलोकात निर्वाणावस्थेत राहिल्यानंतर पुन्हा आपल्या स्वभावांनुसार द्वापरयुगी तथा कलियुगी दुःखी मनुष्य सृष्टीतच (नरक) जन्म-पुनर्जन्म घेत राहतील. तेव्हा सध्याचा जन्म हा फारच अमूल्य आहे आणि म्हणून आपणा सर्वांस दिव्य गुण संपन्न तसेच पवित्र होण्याचा पुरुषार्थ केला पाहिजे.

---

### कुठुन आलास........?

कुठुन झाले येणे, कुठे आता जाणे, ज्ञात असे का नरा तुला ?
कुण्या मार्गाचा तू प्रवासी, काय ज्ञान आहे का तुजपाशी ?
काय कार्य करण्या आलासी, कुण्या नाटकाचा तू नट असशी ?
कोणती भूमिका असे तव पदरी, काय फरमान तुला दाता करी ?
का मायेच्या फशी पडलासी अन् पाच विकारात रुतलासी ?
का केले आसुरी मत जवळी, का व्हावी तुज शिव-माताची विस्मृति ?
पट्टी बांधुनि डोळ्यांवरी ठेचाळशी का तू वरचेवरी ?
का पतित होऊनि तू भटकसी, पावनता का व्हावी तुला नकोशी ?
ज्ञानाचे तो देई अमाप हि़रे परि तव झोळी कां फाटकीशी रे ?
स्वयमची होशी का तू निर्धन जरि तुज करि तो धनवान ?
भाग्य तव तो उजळवि परि आपुले दैव बघुनि का तू रडसी ?
ऊठ, पहा जरा तो विनाश उभा, का वाढविसी पापांचा बोजा ?
आता चूक करता ना उपयोगी, हो योगी, आहे का जीवनाचे ज्ञान तुजलागी ?

# ४. वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेले पुनर्जन्मविषयक वृत्तांत

**आ**ता आम्ही वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांतांच्या आधारे स्पष्ट करणार आहोत की, आपले संस्कार, आपले कर्मखाते, आपली बंधने इत्यादी कशा प्रकारे मृत्यूनंतर आपल्या बरोबर येतात आणि तरीही मनुष्यात्मा पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म घेत नाही.

नवी दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक नवभारत टाइम्सच्या जून व जुलै १९६८ च्या रविवारच्या आवृत्तीच्या प्राध्यापक एच. एन. बॅनर्जी यांनी लिहिलेले काही वृत्तांत प्रकाशित झालेले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, त्यांच्याजवळ वर्तमान काळात जन्मलेल्या काही ५०० व्यक्तींची नावे व पत्ते आहेत, ज्या लहानपणीच आपल्या पूर्व-जन्मीच्या गोष्टी सांगावयास लागल्या होत्या. त्यांपैकी काही दहा-बरा व्यक्तींचा उल्लेख बॅनर्जींनी वरील वर्तमानपत्रात केलेला आहे. त्या व्यक्ती काही भारताच्या तर काही भारताबाहेरच्या आहेत, काही आदी सनातन धर्माच्या तर काही मुसलमान, बौद्ध व ख्रिस्ती धर्माच्या आहेत. पुनर्जन्मविषयक असे हे चित्ताकर्षक वृत्तांत वाचून त्यांवर मनन केल्यास जीवन, मृत्यू, पुनर्जन्म, संस्कार इत्यादी संबंधित अनेक रहस्यांवर प्रकाश पडतो. या रहस्यांचा संक्षिप्त उल्लेख आम्ही येथे करणार आहोत. पुनर्जन्मविषयक हे वृत्तांत परमपिता शिव परमात्म्याने स्पष्ट केलेल्या सिद्धांतांना पुष्टी देतात असे आपणास दिसून येईल.

### पुनर्जन्माच्या वृत्तांताद्वारे नैरात्म्याचे खंडण

नवभारत टाइम्सच्या एकामागून एक अशा सात परिशिष्टांत पुनर्जन्मविषक जे वृत्तांत छायाचित्रे (फोटो) व नाव-गावांनिशी प्रसिद्ध झालेले आहेत त्यांवरून अगदी कट्टर नैरात्म्यवाद्यालाही इतके तर मानावेच लागेल की, शरीराहून भिन्न अशी 'आत्मा' नावाची एक अविनाशी वस्तू आहे. ज्या आठ-दहा मुलांचे वृत्तांत प्रकाशित करण्यात आलेले आहेत त्यांनी बोलावयास शिकताच आपल्या पूर्वजन्माच्या गोष्टी सांगितल्या, आपल्या पूर्वीच्या आई-वडिलांचा व

नातेवाईकांचाही परिचय दिला आणि त्या मुलांना जेव्हा त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी नेण्यात आले तेव्हा त्यांनी आपले पूर्वजन्मीचे घर, दुकान, शाळा इत्यादींना ओळखले. या व्यतिरिक्त, त्यांनी पूर्वजन्मीच्या काही अशाही गोष्टी सांगितल्या की, त्या त्यांच्या पूर्वजन्मीच्या नातेवाईकांनी मान्य केल्या व म्हटले की, बरोबर त्या व्यक्तींबरोबर त्यांच्या या गोष्टी झाल्या होत्या. गेल्या जन्मी आपल्याला मृत्यू कशा प्रकारे आला हेही सर्व मुलांनी सांगितले. आता पुनर्जन्मविषयक यांहून अधिक स्पष्ट व प्रत्यक्ष पुरावा तो काय देता येणार ? या जगात एखादा माणूस जेव्हा एखाद्या घटनेचे स्थळ, वेळ परिस्थिती इत्यादी योग्य प्रकारे सांगतो आणि त्या पुष्ट्यर्थ साक्षिदारही सादर करतो व त्याच्या म्हणण्याविरुद्ध काही पुरावा मिळत नाही तेव्हा न्यायालयात त्याच्याच बाजूने निकाल लागतो. म्हणून या मुलांचे पूर्वजन्मातील आप्त-मित्र जेव्हा त्यांनी सांगितलेला आपल्या पूर्वजन्मीचा वृत्तांत खरा आहे असे सांगतात तेव्हा पुनर्जन्माचा सिद्धांत मानणे न्याय्य आहे. तसे पाहिले तर विचार करण्याजोगी गोष्ट आहे की, माणसाचा मृत्यू झाल्यावर त्याचे शरीर तर जाळले किंवा पुरले जाते, म्हणून या जन्मी जर एखादा मुलगा पूर्वजन्मीच्या गोष्टी सांगू लागला तर स्पष्टच आहे की, शरीर नष्ट झाल्यावरही एक वस्तू सुरक्षित राहते जी दुसरे शरीर धारण करते व अमर राहते. यावरून आत्म्याचे अस्तित्व सिद्धच होते.

पुनश्च, मेंदूत सर्व-काही आहे असे जे लोक मानतात त्यांनाही या आपल्या मतांवर फेरविचार करणे आवश्यक आहे. मेंदू तर शरीराबरोबरच नष्ट होतो व दुसरे शरीर धारण केल्यावर दुसरा मेंदू मिळतो. दुसऱ्या मेंदूला पूर्वजन्माचा वृत्तांत तो काय माहीत असणार आणि पूर्वजन्मीच्या आप्त-मित्रांशी त्यांचे लागेबंधे ते काय असणार, त्याचा त्यांच्याशी भावनात्मक (emotional)संबंध असणे कसे शक्य आहे ?

### देह-अभिमान हा अज्ञानावर आधारित

पुनर्जन्मविषयक प्रकाशित झालेल्या वृत्तांतांवरून हे तर स्पष्टच आहे की, देहाहून वेगळी अशी 'आत्मा' नावाची एक चैतन्य वस्तू आहे जी आपल्याविषयी 'मी' या शब्दाचा वापर करते. पुनर्जन्मावर विश्वास असणारे लोक जरी आत्म्याचे

अस्तित्व मानत असले तरी व्यावहारिक जीवनात मात्र ते स्वतःला 'देह' समजूनच वागतात. या देह-अभिमानामुळेच माणसाच्या जीवनात काम, क्रोध इत्यादी मनोविकार ठाण मांडतात व त्याला दुःखी करतात. ही गोष्ट एका उदाहरणावरून स्पष्ट होईल---

**श्रीलंकेत घडलेली गोष्ट**

प्राध्यापक बॅनर्जींच्या ७ जुलै १९६८ ला प्रकाशित झालेल्या लेखात पुढील वृत्तांत दिलेला आहे. नोव्हेंबर १९६२ त श्रीलंका देशातील नूगेगोडा शहरात श्री व श्रीमती जयसेना नामक जोडप्याच्या घरी एक मुलगा जन्मास आला. दोन वर्षांचा होताच त्याने आपल्या या जन्मीच्या आईस सांगावयास सुरू केले की, 'तू काही **माझी खरी आई** नव्हेस. माझी खरी आई बॅवनगोडा शहरात राहते.'' हे ऐकूण त्याची आई दुःखी तर जरूर झाली परंतु एप्रिल १९६५ पर्यंत तिला या गोष्टीचे गांभीर्य उमजले नाही. एक दिवस मुलासमवेत जयसेना कुटुंबाचे लोक आपल्या मित्रांना भेटण्यासाठी मटाले शहरी मोटारीतून जात होते. वाटेत २४ मैल दर्शविणारा दगड ओलांडून जात असताना मुलगा बसल्या जागेवर उभा राहून ओरडू लागला की, ''माझी आई येथे राहते !''त्याच्या आईने त्याच्या खरेपणाचा छडा लावण्याचा ठाम निश्चय केला.

''मोटारीच्या पुढे पुढे तू चालत राहा आणि तुझी खरी आई कोठे आहे ते दाखव'', असे तिने मुलाला सांगितले. आपल्या **खऱ्या आईला** देण्यासाठी त्याच्याजवळ एक मिठाईची पेटीही देण्यात आली. गर्दीतून वाट काढीत तो मुलगा आपली पूर्वजन्मीची आई (जिला तो आता 'खरी आई' म्हणतो) 'श्रीमती विनी सेनाविरत्ने' हिच्या घरी पोहोचला आणि तिच्या पायांशी त्याने मिठाईची पेटी ठेवली. आपल्या घरच्या माणसांना आपण भेटत आहोत अशा रीतीने तो तेथील कुटुंबियांना भेटला. त्याने आपल्या भावालाही ओळखले आणि त्याला त्याच्या खऱ्या नावाने हाक मारीत आपल्या **खऱ्या आईला** आठवण करून दिली की, एकदा त्याच्या या भावाने त्याला मार दिला होता. मुलाने चार्ली काकाच्या वीज-कारखान्याची गोष्टही विचारली आणि आपल्या शेतांकडेही बोट दाखविले. हे सर्व पाहून श्रीमती सेनाविरत्ने (पूर्वजन्मीची आई) आश्चर्याने थक्क झाली

आणि तिने मान्य केले की, १९६० त तिचा जो मुलगा मृत्यू पावला होता त्यानेच आता जयसेनांच्या मुलाच्या रूपाने जन्म घेतलेला आहे.

पहिला निष्कर्ष

## स्वतः आत्मा असूनही देहाचा अभिमान

उपरोक्त वृत्तांतावर विचार केल्यास स्पष्ट होईल की, आपला पूर्वजन्म आठवत असूनही अर्थात पुनर्जन्म मानत असूनही मुलगा स्वतःला एक 'अविनाशी आत्मा' मानण्याऐवजी देहच मानत आहे. जर तो स्वतःला एक देह न मानता एक आत्मा मानता झाला असता तर आपल्या पूर्वजन्मीच्या आईला 'माझी' खरी आई न म्हणता माझ्या पूर्वजन्मीच्या देहाची आई असे म्हणाला असता कारण श्रीमती सेनाविरत्नेने त्याच्या **पूर्व देहाला** जन्म दिला होता आणि श्रीमती जयसेनाने आता त्याच्या **वर्तमान देहाला** जन्म दिला आहे, तो स्वतः तर अविनाशी आहे आणि म्हणूनच देह जाळल्यावरही मृत्यू पावलेला नाही. परंतु पाहा तर खरे की, माणसाचा देह-अभिमान इतका दृढ झालेला असतो की, पूर्व देहाचा त्याग केल्यावरही त्या देहाच्या मातेला **आपली** माता मानतो. वर्तमान देहाच्या मातेला आपली माता मानणे हा तर देह-अभिमान आहेच परंतु पूर्वजन्मीचा देह जाळल्यानंतर आणि नवा देह घेतल्यानंतरही आपल्या पूर्वजन्मीच्या देहाची आठवण होणे तसेच स्वतःला पूर्वीचा देह मानणे आणि त्या पूर्व देहाच्या संबंधियांशी पूर्वीच्याच नात्याने वागणे तर हेच सिद्ध करते की, माणूस पक्का देह-अभिमानी (Body-Conscious) होऊन बसला आहे, त्याचा हा देह-अभिमान आत्मविस्मृती आणि अज्ञानता यावर आधारित आहे. ज्ञानवान माणूस तर स्वतःला 'आत्मा' समजतो आणि सर्व दैहिक आप्त-मित्रांना अल्पकालीन मानतो.

दुसरा निष्कर्ष

## देह-अभिमानापासून वात्सल्य-द्वेष व त्यामुळे दुःख

पुनर्जन्माचे वृत्तांत वाचून हेही स्पष्ट होते की, देह-अभिमानापासूनच वात्सल्य-द्वेष इत्यादींची उत्पत्ती होते. उदाहरणार्थ, ९ जून १९६८ च्या नवभारत टाइम्सच्या रविवारीय परिशिष्टात छापून आलेला हा मजकूर वाचा. इस्माईलचा जन्म १९५६ साली तुर्कस्थानातील आदान जिल्ह्यात किराणा मालाचा व कसायाचा धंदा करणाऱ्या एका कुटुंबात झाला होता. एके दिवशी

बापाशेजारी लवंडलेला असताना त्याने म्हटले की, ''येथे राहून मी अगदी कंटाळून गेलो आहे. मी माझ्या घरी आपल्या मुलामाणसात परत जाऊ इच्छितो. मी खरा 'अबीत सुजुल्मस' आहे, ज्याला ठार मारण्यांत आले होते.'' इस्माईलने आपल्या पूर्वजन्माचा सारा वृत्तांत कथन केला आणि त्याला कोणी व कोठे ठार मारले होते हे ही सांगितले. या सर्व गोष्टी खऱ्या ठरल्या. **इस्माईल नेहमी आपला पूर्वीचा परिवार आणि प्रियजन यांच्याच विचारांत बुडलेला असतो**; कधी कधी त्याची ही अवस्था त्याच्या माता-पित्यांना समस्या होऊन बसते......एकदा इस्माईलचे वडील काही टरबुजे घेऊन आले होते. इस्माईलने म्हटले की, यांतील सर्वात मोठे टरबूज 'माझी मुलगी' गुलसरीन हिच्यासाठी पाठवून द्या. त्याच्या वडिलांनी जेव्हा तसे करण्याचे नाकारले तेव्हा तो **स्फुंदून स्फुंदून रडू लागला.**

आता आपणच पाहा की, जरी इस्माईल एक लहानसा मुलगा असला तरी पूर्व देहाच्या स्मृतीमुळे तो आपल्या गेल्या जन्मीच्या मुलीला आजही आपली मुलगी मानतो, आणि पितृ-वात्सल्याने भरून जाऊन बोलतो म्हणूनच तो तिला टरबूज पाठवून देण्यास सांगतो, आपल्या पूर्व जन्मीच्या दैहिक मुलीविषयी त्याला आजही इतके वात्सल्य वाटते की तिला टरबूज नेऊन देण्याचे नाकारताच तो मुसमुसून रडू लागतो व आपल्या या जन्मीच्या दैहिक पित्यावर रूष्ट होतो. तेव्हा हे सिद्धच होते की, देह-अभिमानामुळेच वात्सल्य उत्पन्न होते. वात्सल्यापोटी उत्पन्न होणारी आपली इच्छा पूर्ण करण्याच्या मार्गात जेव्हा एखादी व्यक्ती अडथळा आणते तेव्हा त्या व्यक्तीबद्दल माणसाच्या मनात रोष निर्माण होतो आणि वात्सल्य व द्वेष यापायी त्याला दुःख भोगावे लागते, जसे उपरोक्त उदाहरणात इस्माईल आपले मुलीबद्दलचे वात्सल्य तृप्त न झाल्यामुळे ओक्साबोक्शी रडला व दुःखी झाला.

तेव्हा, विकार व दुःख यांपासून मुक्त व्हावे असे जर माणसास वाटत असेल तर त्याने आपण स्वतः एक अविनाशी आत्मा आहोत असा दृढ निश्चय केला पाहिजे अन्यथा त्याची दुःखे संपणार नाहीत; कारण देह-अभिमानामुळे माणसात वात्सल्य-द्वेष वगैरे उत्पन्न होतात आणि त्यापायी त्याची कर्मे विकर्मांचे रूप धारण करतात व ती विकर्मे वाईट संस्काराच्या रूपाने आत्मा आपल्याबरोबर

घेऊन जातो आणि त्या संस्कारांच्यापायी पुन्हा दुःख भोगतो. ही गोष्ट पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

### तिसरा निष्कर्ष

### आत्मा कर्मांचा जमाखर्च आपल्याबरोबर घेऊन जातो

वर ज्या इस्माईलच्या पुनर्जन्माचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याच्याच जीवनात घडलेल्या आणखीन एका घटनेचा वृत्तांतही त्याच वर्तमानपत्रात प्रकाशित झालेला आहे. एकदा मुहम्मद नावाचा एक आइस्क्रीमवाला सध्या जेथे इस्माईल राहातो त्या तुर्कस्थानातील मिदिक जिल्ह्यात आला. इस्माईलने त्याला थांबवून म्हटले, "काय रे, मला ओळखतोस का तू ?" जेव्हा आइस्क्रीमवाल्याने नाही म्हटले तेव्हा इस्माईल म्हणाला, "तू मला विसरलेला दिसतोस, मी अबीत आहे, पूर्वी तू आइस्क्रीमाऐवजी टरबुजे व भाज्या विकत होतास." आइस्क्रीमवाल्याने ही गोष्ट खरी असल्याचे सांगितले आणि इस्माईलबरोबर बराच वेळ गप्पागोष्टी केल्यानंतर इस्माईलच्या रूपानेच अबीताचा पुनर्जन्म झाला आहे हे मान्य केले. जेव्हा इस्माईलचा बाप आइस्क्रीमवाल्याला पैसे देऊ लागला तेव्हा इस्माईल म्हणाला, "अब्बा, त्याला पैसे देऊ नका, त्याने मला पैसे द्यावयाचे आहेत." मुहम्मदाने अबीताच्या कर्जाची गोष्ट मान्य केली.

आता आपणच पाहा, इस्माईलला आपल्या गेल्या जन्माची ही गोष्ट माहीत होती की, तो जेव्हा अबीत नावाचा माणूस होता तेव्हा मुहम्मद (टरबूज विक्या) आपल्याला काही देणे लागत होता. म्हणून त्याने आता आइस्क्रीम घेऊन मागला हिशेब थोडा फार चुकता करावयास लावला. परंतु एखाद्याला आपल्या गेल्या जन्मीच्या गोष्टी माहीत नसतीलही, तरीसुद्धा त्या जन्मीच्या लोकांशी त्याचा हिशेबठिशेब राहिलेला असतोच ना ? त्या मागल्या हिशेबठिशेबामुळेच माणसाला त्याच्या वर्तमान जन्मी काही व्यक्तींकडून अनायासे आणि विशेष परिश्रमाशिवाय काही प्राप्ती होते तर काहींना त्याला विनाकारण देणे परत करावे लागते. म्हणून आपण स्वतः एक आत्मा आहोत असा माणसाने केवळ निश्चय करून भागणार नाही तर पुरुषार्थ केल्यानंतरही एखाद्या व्यक्तीपासून जर त्याला नुकसान पोहचत असेल किंवा अन्य कोण्याप्रकारे हानी होत असेल तर तो आपला मागील जन्मीचा

हिशेबठिशेब आहे असे समजून शांत राहावयास हवे. प्रयत्न केल्यानंतरही योजनेच्या विरुद्ध फळ मिळाल्यास त्याला नियती किंवा पूर्व कर्मांचे फळ मानून धैर्याने व संतुष्टपणे जीवन व्यतीत करावयास हवे.

### चवथा निष्कर्ष

## मृत्यूनंतर संस्कार आत्म्याबरोबर जातात

विचारांती आपण याच निष्कर्षाला येऊन पोहोचाल की, मृत्यूनंतर मनुष्यात्मा केवळ आपले **पूर्व जन्माचे खातेच** बरोबर घेऊन जातो असे नव्हे तर त्याचे मागील संस्कारही त्याच्याबरोबरच जातात. ही गोष्ट पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

३० जून १९६८ त प्रकाशित झालेल्या नवभारत टाइम्सच्या परिशिष्टात लिहिले आहे की, "कृष्णकिशोराचे आपला जुळा भाऊ कृष्णकुमारावर फार प्रेम आहे. तो त्याला आपली प्रत्येक वस्तू देतो. एके दिवशी जेव्हा त्याला विचारण्यात आले की तो कृष्णकुमारावर एवढे का प्रेम करतो तेव्हा तो म्हणाला की कृष्णकुमार हा पूर्वजन्मी त्याचा (कृष्णाकिशोराचा) आचारी होता. एके दिवशी आपल्या आईला त्याने सांगितले की, त्याला तिच्या घरचे खाणे चांगले लागत नाही कारण तो आपल्या घरी फार चांगले खाणे खात होता; त्याला उत्तमोत्तम मिठाया मिळत होत्या, त्याच्यापाशी 'एक बंदुक', दोन मोटारी व एक मोठे घर होते, त्याला पाच मुलगे व पाच सुना होत्या. त्याचे नाव 'पुरुषोत्तम' होते.**एकदा जेव्हा या मुलाने (कृष्णकिशोर) मिठाई मागितली तेव्हा एका बशीतून त्याला थोडी साखर देण्यात आली ती रागाने फेकून देत तो म्हणाला की, पूर्वी त्याला ढीगभर रसगुल्ले मिळत होते आणि आता त्याला घरी न नेल्यास तो मरेल**....मुलाचे काका, आई इत्यादींनी जेव्हा या सर्व गोष्टींचा पत्ता लावण्याचा निर्धार केला तेव्हा मुलाने आपले पुनर्जन्मीचे घर, नातेवाईक इत्यादींना ओळखले आणि ही गोष्ट खरी ठरली की गेल्या जन्मी जेव्हा तो पुरुषोत्तमदास होता तेव्हा त्या पुरुषात्तमदासाकडे दोन मोटारी व एक बंदूक होती आणि तो मिठायांचा मोठा शौकीन होता.

आता आपण पाहा, मिठाई खाण्याची जी चटक गेल्या जन्मी पुरुषोत्तमाला लागली होती ती आजपर्यंत म्हणजे मेल्यानंतर त्याचा पुनर्जन्म

कृष्णकिशोराच्या रूपाने झाल्यावरही तशीच कायम आहे म्हणूनच तो गेल्या जन्मीच्या आपल्या आचाऱ्यावर (आता जुळा भाऊ) प्रेम करतो व मिठाई न मिळाल्याने म्हणतो, ''जर मला माझ्या घरी पाठविले नाही तर मी मरेन.'' जणू मिठाईशिवाय तो जगू शकणे कठीण आहे आणि सध्याच्या घरात राहणे त्याला पसंत नाही! उघडच आहे की जर या जन्मी आपल्या जीभेवर ताबा नसेल तर पुढील जन्मीही आपण चटकेचे दास होऊन बसू. याच प्रकारे, इतर इंद्रियांवरही जर आपण ताबा न ठेवू तर पुढील जन्मी आपणास त्याचा दास होऊन राहावे लागेल. वरील उदाहरणच घ्या, रसगुल्ल्यांच्या स्वादामागे लागलेल्या पुरुषोत्तमाच्या पदरात आता रसगुल्ल्यांऐवजी साखरच पडली. एखाद्या विषयाच्या मागे लागून त्याचा उपभोग घेणाऱ्या माणसाची तृष्णा उत्तरोत्तर वाढतच जाते. म्हणून माणसाने आपल्या कर्मांविषयी फार सावधगिरी बाळगावयास हवी कारण कर्मांपासून संस्कार बनतात आणि ते मृत्यूनंतरही आत्म्याबरोबर जातात व पुढील जन्मीही त्याला त्रास देतात तसेच त्यांच्या अधीन झालेला माणूस पुन्हा तशीच कर्मे करतो. मोह-ममता आणि संस्कार हे असे धागे आहेत जे दिसत नाहीत परंतु माणसाला पार जखडून टाकतात. हे कित्येक उदाहरणांवरून स्पष्ट करता येईल.

### पाचवा निष्कर्ष

### मोह-ममता व वाईट संस्कारांमुळे दुःखपूर्ण जन्म-मरणाचे बंधन

वरील, कृष्णकिशोर व कृष्णकुमार यांच्या पुनर्जन्माच्या उदाहरणावरच विचार करा. कृष्णकिशोर हा पूर्वजन्मी 'पुरुषोत्तम' नावाचा एक शेठ तर कृष्णकुमार त्याचा आचारी होता. त्या पूर्वजन्मी पुरुषोत्तमाला मिठाई खाण्याची चटक लागलेली होती आणि त्याचा आचारी त्याला चांगल्या मिठाया बनवून देत असे. यामुळे पुरुषोत्तमात आपल्या आचाऱ्याविषयी मोह-ममता उत्पन्न झाली आणि मिठायांत आसक्त होण्याचा संस्कार बनला. त्याचा परिणाम असा झाला की मोह-ममतेच्या धाग्यांनी जखडलेल्या पुरुषोत्तमाचा व त्याच्या आचाऱ्याचा पुढील जन्म जुळ्या भावांच्या रूपात झाला आणि त्या दुसऱ्या जन्मातही ते मोह-ममतेच्या धाग्यांनी जखडलेले राहिले. या मोह-ममतेच्या बंधनांचे आणखीन एक उदाहरण पाहा.

२ जून १९६८ च्या रविवारच्या परिशिष्टात बॅनर्जींनी लिहिले आहे की, 'जोआना' आणि 'जॅकेलीन' नावाच्या दोन मुली होत्या. त्यांच्या वडिलांचे नावे 'श्री पोलक' असे होते. या दोन मुली एकमेकींचा हात धरून आपल्या गावातील चर्चकडे जात असताना एका मोटारीखाली सापडल्या. त्यांच्या मृत्यूनंतर श्री व श्रीमती पोलक यांच्या घरी ज्या जुळ्या मुली जन्मास आल्या त्यांनी आपल्या पूर्वजन्माची सारी हकिकत सांगितली. आपला मृत्यू मोटारीखाली सापडल्यामुळे झाला होता हेही त्यांनी स्पष्ट केले. आजही छोटी मुलगी आपल्या मोठ्या बहिणीशी हुबेहूब अशीच वागते जशी ती पूर्वजन्मी वागत होती आणि ती असेही म्हणते की, पूर्वजन्मी ती तिची छोटी बहिण होती.

अशा प्रकारे अनेक उदाहरणांवरून हे सिद्ध होते की, मोहममता व संस्कार ही अशी सूक्ष्म बंधने आहेत की त्यांत जखडलेला माणूस जन्म-मरणात येऊन दुःख भोगतो. म्हणून जर माणसाला दुःखदायक जन्म-मरणाच्या चक्रापासून सुटावेसे वाटत असेल तर त्याने मोह-ममतेचा त्याग करावयास हवा व अनासक्त होऊन तथा आत्मिक प्रेम आत्मसात करून व्यवहार करावा अन्यथा त्यांतच जखडून राहिल्यास त्याला निरनिराळ्या घरांत जन्म घ्यावा लागेल.

**सहावा निष्कर्ष**

## मृत्यूनंतर मनुष्यात्मा स्वर्गास जातो की पशुयोनीत ?

पुनर्जन्माचे जे वृत्तांत नवभारत टाइम्स व अन्य वर्तमान पत्रांत प्रकाशित झालेले आहेत. त्या सर्वांद्वारे हे सिद्ध होते की, मनुष्यात्मा पशुपक्ष्यादी योनींत जन्म घेत नाही कारण आजपर्यंत कोणीही मी पूर्वजन्मी घोडा वा कबुतर होतो असे सांगितलेले नाही, उलटपक्षी सर्वांनी आपण पूर्वजन्मी माणूसच होतो असा दावा केलेला असून तो पुराव्यानिशी सिद्धही झालेला आहे. या व्यतिरिक्त या वृत्तांतांवरून हेही सिद्ध होते की, मरणोत्तर कोणताही आत्मा स्वर्गवासी झाला नाही तर त्याने याच जगात कोणत्या ना कोणत्या घरी दुसरा जन्म घेतलेला आहे. आजपर्यंत कोणत्याही आत्म्याने हे सांगितलेले नाही की, तो स्वर्गात गेला होता किंवा नरकात गेला होता जेथे वैतरणी नदी होती अथवा गायीचे शेपूट पकडून पार व्हावे लागत असे. तेव्हा प्रत्येक व्यक्तीच्या मरणानंतर तिच्या घरची माणसे हे जे

सांगत असतात की, "ती स्वर्गवासी झालेली आहे," हे पूर्णपणे चुकीचे आहे आणि शास्त्रवादी लोक हे जे म्हणतात की, "या पृथ्वीच्या खाली कोठेतरी नरक आहे," हे ही साफ चुकीचे आहे. खरे म्हणजे मनुष्यात्म्याला मनुष्ययोनीतच पुनर्जन्म घेऊन सुख वा दुःख भोगावे लागते आणि हेच जग द्वापर व कलियुगांत नरक तर सत्य व त्रेता युगांत स्वर्ग असते.

### सातवा निष्कर्ष

## आत्मे वेगवेगळे असणे सिद्ध

याव्यतिरिक्त, पुनर्जन्माच्या वृत्तांतांद्वारे हेही सिद्ध होते की, आत्मे वेगवेगळे आहेत आणि कर्ता-भोक्ता आत्माच आहे, देह नव्हे. दोन आत्म्यांनी आपल्या पूर्वजन्माच्या हकिकती सांगणेच सिद्ध करते की, आत्मे वेगवेगळे आहेत, त्यांच्या पूर्वजन्माच्या कर्मांचे खातेही वेगवेगळे असते आणि त्या कर्मांच्याच आधारे त्यांचा पुनर्जन्मही वेगवेगळा होतो. म्हणून 'सर्वं खल्विदं ब्रह्म' अर्थात सर्वच एकाच ब्रह्माची अनेक रूप आहेत हा सिद्धांत चुकीचा ठरतो. तसेच, या हकिकतींवरून आत्मा आपल्या कर्मांचे फळ स्वतःच भोगतो हेही सिद्ध होते. मेल्यानंतर शरीर नष्ट होते आणि आत्मा पुनर्जन्म घेतल्यानंतर म्हणतो की, पूर्वजन्मी हत्या केल्यामुळे किंवा मोटारीखाली सापडल्याने त्याचा देहांत झाला होता अर्थात मृत्यूचे दुःख झाले होते. आत्माच सांगतो की, पूर्वजन्मी त्याला रसगुल्ले खावयास मिळत असत आणि या जन्मीमात्र साखर मिळत आहे. कित्येक लोक म्हणतात की, आत्म्याचे मनबुद्धी रूप एक 'कारण शरीर' किंवा 'लिंग शरीर' असते; परंतु वास्तविक आत्मा स्वतःच बिन्दुरूप लिंगाकार असून मन-बुद्धी त्यांच्याहून भिन्न नाहीत तर त्याची अनुभवशीलता व विचारशीलता इत्यादींचे ते नाव होय; तेच त्याच्या जन्म, कर्म व भोगाचे कारण आहे.

### आठवा निष्कर्ष

## पुनर्जन्माच्या सिद्धांताद्वारे नियतीची गोष्ट सिद्ध

आजपर्यंत पुनर्जन्माचे जे वृत्तांत प्रकाशित झालेले आहेत त्यांद्वारे जगातील सर्वच घडामोडी पूर्वनिश्चित असल्याचे सिद्ध होते. उदाहरणार्थ, मागच्या

पानावर मोह-ममता व संस्कार यांची गोष्ट स्पष्ट करण्यासाठी श्री. पोलकांच्या दोन मुली 'जोआना' व 'जॅकलीन' यांचा जो वृत्तांत दिलेला आहे त्यावरच विचार करा. पूर्वजन्मी त्या दोन बहिणी चर्चकडे जात असताना मोटारीखाली सापडून मृत्यू पावल्या होत्या आणि आता दोघींनीही आपल्या त्याच पित्याच्या घरी पुन्हा जन्म घेतलेला आहे. यावरून हे सिद्ध नाही का होत की, दोन्हींचा मृत्यू आणि पोलकांच्या घरी दुसऱ्यांदा जन्म या घटना पूर्वनिश्चित होत्या ? अन्यथा जर त्या मृत्यू पावल्या नसत्या तर पोलकांच्या घरी त्यांचा दुसरा जन्म कसा झाला असता ? तसेच, यावरून हे सिद्ध नाही का होत की, मोटारीने एका विशिष्ट समयी चर्चच्या रस्त्यावरून जाणे, दोन्हीं बहिणींचे त्याचवेळी त्याच रस्त्याने जाणे, नंतर त्यांनी मोटारीखाली सापडणे, मोटारीला त्यापूर्वी ब्रेक लागू न शकणे, तिकडे श्रीमती पोलकांच्या गर्भात पहिल्यापासूनच त्यांची दुसरी शरीरे तयार होणे या सर्व गोष्टी पूर्वनिश्चित होत्या ? घटना पूर्वनिश्चत असल्यानेच आजही एखादी व्यक्ती मरण पावली तर लोक तिच्या आप्त-मित्रांचे सांत्वन करताना म्हणतात की, 'जे व्हायचे होते ते झाले. नियतीच अशी आहे तेव्हा आता रडण्यात काय अर्थ आहे ?''

पूर्वनिश्चिती व नियती (Pre-destination) ही केवळ भारताच्या आदी सनातन धर्माच्या लोकांनीच मान्य केलेली आहे असे नव्हे तर ख्रिस्ती व मुसलमान लोकही तसे मानत आलेले आहेत. उदाहरणार्थ, बायबलाच्या १६ व्या अध्यायात सेंट जॉनने पुनर्जन्म व नियती यांविषयी उल्लेख केलेला आढळतो. प्रत्यक्ष येशू ख्रिस्ताबद्दल लोक सांगतात की, त्याच्यापूर्वी झालेल्या प्रेषितांनी भविष्यवाणी उच्चारली होती की येशूच्या रूपाने एक प्रेषित जन्मास येईल. जर जगातील घटना पूर्वनिश्चित नसतील तर पूर्वीच कोणी असे कसे सांगू शकेल की अमूक माणूस जन्मास येईल व त्याची अमूक लक्षणे असतील ?

त्याचप्रमाणे मुसलमान लोकही कुराणातील पुनर्जन्मविषयक या उल्लेखाचा दाखला देतात की, ''साऱ्या जगात फिरून पाहा की कशा प्रकारे त्याने खुदाचे (परमात्मा) सेवक निर्माण केले आहेत, म्हणून **दुसऱ्या जन्मी** खुदा त्यांना पुन्हा जीवन देईल कारण खुदा सर्वशक्तिमान आहे.'' परंतु या उल्लेखा

व्यतिरिक्त, वर आम्ही तुर्कस्थानातील इस्माईल व आइस्क्रीमवाला या मुसलमान लोकांच्या येथील पुनर्जन्माचे जे उदाहरण दिले आहे त्यावरूनही ही गोष्ट सिद्ध होते आणि पुनर्जन्म मानल्यास घटना पूर्वनिश्चित मानाव्याच लागतील अन्यथा एके ठिकाणी एखाद्याचा मृत्यू होऊन त्याने दुसऱ्या घरी जन्म घेण्याच्या घटनेचा संबंध आपण कसा लावाल ? मृत्यू आणि जन्म या दोन घटना जर आपण पूर्वनिश्चत किंवा 'अटळ नियती' मानाल तर आपणास दुसऱ्या सर्व घटनाही पूर्वनिश्चित मानाव्याच लागतील कारण या जगातील सर्व घटनांचा एकमेकांशी अतूट संबंध आहे. अशा प्रकारे, पुनर्जन्मांच्या वृत्तांतावर गंभीरपणे विचार केल्यास आपणास असे आढळून येईल की, ईश्वरी ज्ञानाच्या अनेक सिद्धांतांना हे वृत्तांत पुष्टीच देतात.

## उत्तरोत्तर अधःपतनाचा सिद्धांत

दिल्लीहून प्रकाशित होणाऱ्या 'वीर अर्जुन' या वर्तमानपत्राच्या दिनांक १८ ऑगष्ट, १९६८ च्या आवृत्तीत 'मानवाच्या इतिहासातील पाश्चात्य समजूती' या शीर्षकाखाली देवदत्त बाली यांचा एक लेख छापून आलेला आहे. यात लेखकाचे पाश्चात्य लेखकांचे दृष्टिकोण आणि भारताचे प्राचीन दृष्टिकोण यांतील अंतर स्पष्ट केले आहे. या लेखात असे लिहिले आहे की, पश्चिमात्य इतिहासकार **विकासवादाचा** (Evolution) सिद्धांत मानतात तर वेदांमध्ये आणि भारतीय प्राचीन परंपरेत **ऱ्हासवादालाच** मान्यता दिलेली आढळते. याचा अर्थ असा आहे की, जगाची उन्नती होत आहे, जगात उत्तरोत्तर संस्कृतीचा विकास होत आला आहे असे पाश्चात्य लोक मानतात तर जगाचा उत्तरोत्तर ऱ्हास होतो असे भारतीय लोकांची मान्यता आहे. सत्ययुगात संस्कृती व सुख यांनी कळस गाठलेला होता परंतु हळूहळू त्यांच्या कलांचा ऱ्हास होत गेला. सृष्टीची रचना करण्याच्या काळात परमात्म्याने परमसद्गुरूच्या रूपात मानवाला ईश्वरी ज्ञान दिले असे भारतात मानले जाते तर पाश्चात्य लोक असे मानतात की, आदी काळात मानव हा असंस्कृत व रानटी होता आणि हळूहळू त्याचा विकास होत गेला.

वेदांतील **'अकृष्टपश्चा भूमि'** या सिद्धांतावर बोट ठेवून लेखकाने दुसरा फरक सांगितला आहे. या सिद्धांताचा अर्थ लेखकाने पुढीलप्रमाणे दिला आहे– ''सृष्टीच्या प्रारंभी प्राकृतिक शक्ती पूर्ण यौवनात होत्या. त्यावेळी भूमी 'अकृष्टपश्चा' असते म्हणजे नांगरणे, खत घालणे आणि बीज पेरणे अशी तिची मशागत करणे आवश्यक नसते. सर्व प्रकारच्या वनस्पती व फुले फळे आपोआप तिच्यातून निर्माण होतात. इजिप्त देशाच्या अती प्राचीन परंपरांच्या दाखल्यावरून हे ज्ञात होते की, प्राचीन इजिप्ती लोकही वेदाची ही मान्यता मानत होते की, 'एक सुवर्ण युग असे होते ज्यावेळी मानव भूतलावरील सर्व प्राण्यांशी अगदी मित्रत्वाने वागून जीवन व्यतीत करीत असे व **पृथ्वीच्या स्वयंभू फळांवर** (Spontaneous fruits of the Earth) आपला उदर निर्वाह करीत असे,' पृथ्वीच्या या अवस्थेला वैदिक साहित्यात 'अकृष्टपश्चा' म्हटले आहे.

लेखात पुढे लिहिले आहे की, सृष्टीच्या प्रारंभी भूमी 'अकृष्टपश्चा' होती त्यामुळे आदी मानव' निरामिष-भोजी (शाकाहारी) होता. हे तथ्य प्राचीन इजिप्ती लोकही जाणत होते... प्रकृतीच्या ऱ्हासवादाचा वैदिक सिद्धांत हे सांगतो की, पृथ्वीचे वय जसजसे वाढत जाते तसतसा तिच्या प्राकृतिक शक्तींचा ऱ्हास होत जातो आणि क्रमशः अशी स्थितीही येते की मातीत बीज पेरणे आवश्यक होऊन बसते. नंतर क्रमाक्रमाने धरतीची अशी अवस्था होऊन बसतेकी नांगरणी वगैरे करून तिचा सुपीकपणा वाढविणे आवश्यक भासू लागते. अशा प्रकारे, जमिनीचा कस कमी होता होता अशी पाळी येते की तिच्यात खत घालणे आवश्यक होऊन बसते.... ऱ्हासवादाचा हा सिद्धांत जातींना व राष्ट्रांनाही लागू होतो.... कधी काळी आपले शौर्य, पराक्रम व विद्वत्ता यांबद्दल प्रसिद्ध असलेल्या प्राचीन काळातील त्या सर्व जाती आता नामशेष झालेल्या आहेत. त्यांच्या गतवैभवाचे चिह्न ऐतिहासिक पत्रांशिवाय दुसरे कोठे सापडत नाही. आज लोकांची जी दशा झालेली आहे. तिची तुलना त्यांच्या पूर्वजांचा श्रेष्ठपणा तसेच शारीरिक, मानसिक व नैतिक विकास यांच्याशी करता तरी येईल का ?

आर्य समाजी पत्राने प्रकाशित केलेल्या वरील मान्यता ज्यांना लेखकाने वैदिक सिद्धांत म्हटले आहे त्यावर विचार करा. हे सिद्धांत खरे असून अनेक

उपायांनी त्यांचा खरेपणा सिद्ध करता येतो. हेच सिद्धांत प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व-विद्यालय लोकांसमोर ठेवत असते, परंतु तेव्हा हेच लोक ही केवळ तुमची कल्पना आहे असे म्हणून हसण्यावरी गोष्ट नेतात. आम्ही लोकांना जेव्हा सांगतो की, 'सत्ययुगांत सर्व ऐश्वर्यें विपुल प्रमाणात प्राप्त होत होती, त्यांसाठी परिश्रम करावे लागत नसत. कारण सर्व स्त्री-पुरुष श्रेष्ठ कर्म करणारे, पवित्र व दैवी स्वभावाचे होते,'' तेव्हा हेच लोक म्हणतात की, ''सर्व युगे सारखी आहेत. अपवित्रता, मनोविकार, दुःख इत्यादी सर्व युगात असतात.'' जेव्हा आम्ही लोकांना समजाविण्याचा प्रयत्न करतो की, ''प्रत्येक धर्मवंश व प्रत्येक मनुष्यात्मा यांच्या संस्कारांच्या चार अवस्था असतात, त्यांपैकी पहिली सर्वोत्तम अवस्था असते, नंतर हळूहळू ऱ्हास होत जातो,'' तेव्हा हे लोक म्हणतात की, ''या सर्व तुमच्या कपोलकल्पित गोष्टी आहेत.'' परंतु नंतर हे स्वतःच म्हणतात की ''ऱ्हासवादाचा सिद्धांत जातींना व देशांनाही लागू पडतो.''

'ऱ्हासवाद' आणि 'अकृष्टपश्चा' या सिद्धांतावर विचार केल्यास आपण या निष्कर्षाला येऊन पोहचाल की, कलियुगाचा सध्या अंतिम समय आहे कारण आता शेतात नांगर फिरविणे तसेच केवळ नैसर्गिक खते नव्हे तर तर कृत्रिम खते घालणेही आवश्यक होऊन बसले आहे आणि आज एवढे सर्व परिश्रम करूनही अन्नापासून पूर्वीसारखी पोषक शक्ती मिळत नाही. सांप्रत जाती, देश व धर्म-वंश यांचा नैतिक ऱ्हासही फारच झालेला आहे हे कोणीही नाकारणार नाही. म्हणून कलियुगाची सध्या बाल्यावस्था आहे असे मानणे म्हणजे ऱ्हासवाद व अकृष्टपश्चा या सिद्धातांचे यथार्थ आकलन झालेले नाही असेच म्हणावे लागेल.

तसेच, सृष्टीच्या प्रारंभी लोक अधिक सुसंस्कृत, सदाचारी व श्रेष्ठ होते आणि परमात्म्याने स्वतः परमसद्गुरूच्या रूपाने ज्ञान दिले होते या प्राचीन मान्यतेवरून हा सिद्धांत सिद्ध नाही का होत की, कलियुगाच्या अंती परमपिता परमात्म्याने परमसद्गुरूच्या रूपाने मानवी शरीराच्या माध्यमाद्वारे ईश्वरी ज्ञान देऊन लोकांना सुसंस्कृत व सात्विक बनविले ? अन्यथा सत्ययुगात सुसंस्कृत व सदाचारी लोक कोठून आले ?

## स्वर्ग व नरक याविषयींचे निष्कर्ष

या व्यतिरिक्त, ऱ्हासवादाच्या आधारे असे नाही का म्हणता येणार की, हीच सृष्टी प्रारंभी सत्ययुगात जेव्हा संपूर्णपणे सुखसंपन्न होती तेव्हा 'स्वर्ग' होती व द्वापर युगापासून तिचा स्पष्टपणे ऱ्हास सुरू होऊन कलियुगात ती 'नरक' बनते ? म्हणून 'स्वर्ग' कोठेतरी वर आहे आणि नरक पृथ्वीच्या खाली आहे असे मानणे चुकीचे ठरेल. आता तर अंतरिक्षवीरांनीही चंद्रावर जाऊन तेथे स्वर्गच काय पण लोकवस्तीही नसल्याचे सांगितले आहे.

या गोष्टींच्या पुष्ट्यर्थ, वर्तमानपत्रांत प्रकाशित झालेल्या खालील वृत्तांतावर विचार करा.

## परलोक आणि यमलोक

याबाबतीत दिनांक १५ ऑगस्ट १९६८ च्या दैनिक 'प्रतापात' छापून आलेला मजकूर लक्षपूर्वक वाचा–

एका आत्म्याने मुसलमान पीराच्या रूपाने जीवन व्यतीत केल्यानंतर लुधियाना जिल्ह्यातील एका गावात ५ ऑगस्ट १९६८ या दिवशी जन्म घेतल्याची एक रोमांचकारी घटना घडली आहे. त्या पीराची कबर उत्तर प्रदेशात एके ठिकाणी आहे. त्या पीराचा आत्मा 'मनमोहन' या नावाच्या ९ व्या इयत्तेत शिकणाऱ्या एका मुलाच्या **शरीरात ठाण मांडून बसला.** हा मनमोहनसिंह सहारनपूरच्या उपनगरात राहणाऱ्या डॉक्टर शेरसिंहांचा मुलगा होय. आपल्या मुलाला झालेली भूतबाधा नाहीशी करण्यासाठी डॉक्टरांनी देवऋषी, पंचाक्षरी, मांत्रिक, पीर, फकीर इत्यादींकडे जाऊन बरेच इलाज केले. ते करतारपूर, मालेरकोटला व डेरा बडाभागसिंह येथेही जाऊन आले. परंतु काहीच उपयोग झाला नाही. मालेरकोटलात जेव्हा एक देवऋषी त्या मुलातील भूत काढण्याचा प्रयत्न करीत होता तेव्हा भूत झालेला त्या पीराचा आत्मा म्हणाला की, "तू हे काम सोडून दे. मीही गंडे-दोरे, ताईत, मंत्र-तंत्र इत्यादी प्रकार करीत असे. म्हणून भूत बनलो आहे. **गंडे-दोरे इत्यादी करणारे सर्व भूत बनतात."** यावर त्या देवऋषीने मुलाला एखाद्या संत किंवा महात्म्याकडे घेऊन जाण्याचा सल्ला दिला. म्हणून डॉक्टर शेरसिंह मुलाला घेऊन कित्येक साधू–संतांकडे गेले परंतु पीराचा

आत्मा काही निघाला नाही. शेवटी ते संत राडेवालाकडे गेले. त्यावेळी ते हापूड मुक्कामी होते. त्यांच्याकडे पोहोचताच त्या पीराचा आत्मा बोलू लागला. तो संत राडेवाला यांना म्हणाला की, "आपण ईश्वराचे उपासक आहात, मला मुक्ती मिळवून द्या. एक हजार वर्षापूर्वी काही मुसलमानांबरोबर मी भारतात आलो होतो. तेथे आल्यावर माझे लग्न झाले आणि मला एक मुलगी झाली. ही मुलगी फार सुंदर होती. हा मुलगा ज्याच्या शरीरात सध्या मी राहतो त्याचा आत्माही त्यावेळीही **एका पुरुषी शरीरात होता.** त्याने माझ्या मुलीशी अनैतिक संबंध प्रस्थापित केले. मी त्याला तसे करण्यास मनाई केली परंतु त्याने मला जुमानले नाही. तेव्हा मी सुडाच्या भावनेने पेटून उठलो आणि एके दिवशी त्याचा खून केला.

माझ्या मृत्यूनंतर माझ्या आत्म्याला **यमराजापुढे नेण्यात आले.** तेथे दोन यमदूत होते, एक पुण्याचे फळ देणारा व दुसरा पापाचे फळ देणारा. माझ्या पाप-पुण्याचा हिशेब तयार होता. गंडे-दोरे व ताईत तू देत होतास म्हणून तू भूत बनशील असे मला सांगण्यात आले. माझी मुक्ती मग कधी होईल असे मी विचारताच उत्तर मिळाले– "एक हजार वर्षानंतर आणि तीसुद्धा ज्या मुलाचा तू सूड घेतलास त्याच्याचद्वारे होईल." काही वर्षांपूर्वी इतर भूतांबरोबर माझ्या कबरीवर मी बसलो होतो तेव्हा हा मुलगा तेथे आला आणि जवळच त्याने लघवी केली. मी त्याला मारावयास उठताच इतर भूते म्हणाली की," जाऊ दे, मुले खट्याळच असतात." जेव्हा मी निरखून पाहिले तेव्हा ज्याचा सूड घ्यावयाचा आहे तोच हा मुलगा असल्याचे मला कळून आले. म्हणून मी याच्या शरीरात प्रवेश केला. मी यापूर्वी कित्येक लोकांच्या शरीरात प्रवेश करून त्यांना मारून टाकले होते. परंतु या मुलाला काही मी मारले नाही.

तेव्हा संत राडेवाला म्हणाले की तू आता या मुलाला सोडून दे. यावर पीराचा आत्मा बोलला की, "मला जेव्हा मुक्ती मिळेल तेव्हाच मी याला सोडेन." संत म्हणाले, "मानवी शरीरात आल्यास तुला मुक्ती मिळू शकेल. म्हणून तुला जन्म घ्यावा लागेल." तेव्हा तो आत्मा म्हणाला, "मला जन्म मिळणार असेल तर मी तयार आहे. तोपर्यंत मला आपल्या संगतीत राहू द्या. नंतर जेव्हा जन्म घेण्याची मला संधी मिळेल तेव्हा मी निघून जाईन. नाही तर १००० वर्षांनंतर मला मुक्ती मिळेल आणि तीही या मुलाद्वारेच होईल असे मला सांगण्यात आलेलेच आहे."

अशा रीतीने त्या मुलाच्या शरीराद्वारे तो पीराचा आत्मा संत राडेवालाच्या संगतीत राहू लागला. काही दिवसानंतर त्यांनी त्या आत्म्याला सांगितले की श्रीगुरूदेवसिंह ललित यांच्याकडे मुलाच्या रूपाने तुझा जन्म होईल. **या सर्व गोष्टींवर माझा विश्वास बसत नव्हता. परंतु मी मनमोहनसिंहाची ५ ऑगस्टपूर्वी आणि नंतरही भेट घेतली. त्यावेळेस त्याच्या शरीरात पीराचा आत्मा हजर होता.** त्या आत्म्याने माझ्या ४० प्रश्नांना उत्तरे दिली. तो म्हणाला की त्याचा देह सूक्ष्म रूपात आहे आणि तो नरकाच्या आगीप्रमाणे गरम आहे. मी सूक्ष्म देहात असल्याने काही करू शकत नाही. मी शरीरात प्रवेश करतो **तरीही मला वाटेल तेथे मी जाऊ शकतो. मी स्वतः बोलू शकत नाही परंतु दुसऱ्या कोणाच्या जीभेद्वारे बोलू शकतो.** दिसू शकेल असे कोणतेच रूप मला नाही. एका प्रश्नाचे उत्तर देताना तो म्हणाला की, जसे हे **जग आहे, तसेच** आत्म्यांचे जगही आहे आणि बरेच लोक भूताच्या रूपातही राहतात. यमराजाचे रूपही सूक्ष्म आणि प्रकाशमय होते. तेथे बोलण्याची आवश्यकता लागत नाही. पाप-पुण्याचा हिशेब आपोआप होतो. सर्व काही स्पष्ट असते त्यामुळे नाकारण्यास वावच नसतो. नंतर मी ६ ऑगस्टला मनमोहनसिंहाला भेटलो, तेव्हा तो म्हणाला पीर निघून गेला आहे. आता मला माझे शरीर हलके फुलके वाटू लागले आहे. पूर्वी मला माझ्या मानगुटीवर कोणी बसल्यासारखे वाटत असे. मनावर मोठे दडपण असे. डोकेही जड झाल्यासारखे वाटायचे. भूत कित्येक वर्षे त्याच्या शरीरात ठाण मांडून बसले होते. जन्म घेण्यापूर्वी ते म्हणाले होते की, "इतर मुलांप्रमाणे मी कधी रडणार नाही. १०—१२ वर्षे मी येथे राहीन. नंतर ईश्वराची भक्ती करेन कारण मला मुक्ती मिळवावयाची आहे."

### उपरोक्त वृत्तांतावर विचार

हा वृत्तांत 'प्रताप' या आर्य समाजाच्या एका वर्तमानपत्राने छापलेला आहे. ज्या गृहस्थाने हा वृत्तांत लिहिलेला आहे तोही अजून जीवंत आहे. ज्याच्या शरीरात भूताने प्रवेश केला होता तो मुलगा व त्याचे वडीलही विद्यमान आहेत. ज्या संताकडे आणि त्यांच्या ज्या मुक्कामी हा वार्तालाप झाला तेथेही या गोष्टीची चौकशी करता येईल. तेव्हा कोणाला याबद्दल संशय वाटत असेल तर त्याचा

खरेपणा पडताळून पाहण्यासाठी वर उल्लेखिलेल्या व्यक्तींशी संपर्क साधून त्याला या गोष्टीची चौकशी करता येईल. तसे पाहिले तर चौकशी करण्याचीही काही गरज नाही कारण भारतात परकाया प्रवेशाचा सिद्धांत सनातन धर्मी, आर्य समाजी, अद्वैतवादी इत्यादी सर्व मानत आलेले आहेत. उपरोक्त वृत्तांतातील जो मजकूर ठळक अक्षरात छापलेला आहे त्याकडे लक्ष दिल्यास आपण खालील निष्कर्ष काढू शकतो.

**शरीराहून भिन्न 'आत्मा' नावाची एक वस्तू आहे; ती परकाया प्रवेश करते.**

सर्व प्रथम हे सिद्ध होते की, शरीराहून भिन्न 'आत्मा' नावाची एक वस्तू आहे. शरीर जाळल्यानंतर किंवा कबरीत पुरल्यानंतरही आत्मा अस्तित्वात असतो. **पापकर्मांमुळे तो भूत बनेल आणि त्या अवस्थेत हजार वर्षेही राहील परंतु तो पशुपक्ष्यादी योनींत जात नाही.** तो हजार वर्षापूर्वी मानवी शरीरात होता आणि आजही मानवी शरीरातच आहे.

यावरुन सिद्ध होते की आत्मे वेगवेगळे आहेत आणि एक आत्मा दुसऱ्या आत्म्याच्या शरीरात प्रवेशही करू शकतो. **प्रवेश केल्यानंतर आत्मा दुसऱ्याच्या मुखाचा आधार घेऊन बोलूही शकतो, अन्यथा अव्यक्त अवस्थेत तो बोलू शकत नाही.**

**ब्रम्हलोक किंवा परलोक अस्तित्वात आहे.**

उपरोक्त वृत्तांतावरून हेही स्पष्ट होते की, या मनुष्य-लोकाव्यतिक्ति एक **परलोकही** आहे जेथे आत्मे मुक्तावस्थेत राहतात. तसेच एक **सूक्ष्म लोकही** आहे आणि तेथे **यमपुरी** आहे. परंतु या 'मनुष्यलोकाखाली आणखी कोणताही लोक नाही तर हा कलियुगी मनुष्य-लोकच **नरक** असून तेथे मनुष्यात्मे दुःख भोगत असतात. अन्यथा त्या पीराने तर एक हजार वर्षांपूर्वी मनमोहन सिंहालाही मारले होते आणि नंतर कित्येक व्यक्तींच्या शरीरात प्रवेश करून त्यांना मारले होते; जर नरक पृथ्वीच्याखाली कोठे तरी असता तर त्या पीराच्या पापी आत्म्याला खालच्या लोकात पाठविण्यात आले असते.

# ५. आत्म्यांच्या योनी-परिवर्तनाच्या प्रश्नावर एका नव्या दृष्टिकोनातून विचार

**आ**पल्या पापकर्मांची शिक्षा भोगण्यासाठी मनुष्यात्मा पशुपक्ष्यादी योनीत जातो ही जी एक समजूत आहे तिच्यावर आता आपण दंड विधानाच्या दृष्टिकोनातून विचार करून पाहू या की ही समजूत काय संयुक्तिक आहे ?

**न्याय किंवा कायद्याच्या दृष्टीने शिक्षेचे चार मुख्य उद्देश**

सर्व प्रथम आपल्याला या गोष्टीवर विचार करावयास हवा की, एखाद्या व्यक्तीला शिक्षा का देण्यात येते ? दंड विधान जाणणारे लोक (criminalogists) शिक्षेचे चार मुख्य उद्देश मानतात. एक शिक्षा अशी आहे की जी एखाद्याला नुकसान वा तोटा सहन करावयास लावण्याला कारणीभूत होणे किंवा त्याला इजा करणे वा मारणे याचे प्रायश्चित म्हणून (Retributive Punishment) दिली जाते. जुन्या काळी लोक शिक्षेचा बहुधा हाच मुख्य हेतू मानत असत. 'दातास दात आणि डोळ्यास डोळा अर्थात जशास तसे अशा प्रकारे शिक्षा देण्याची त्यांची पद्धत असे. एखाद्याने दुसऱ्याच्या धनाची चोरी केली तर कसेही करून त्या चोरणाऱ्या व्यक्तीलाही त्याबद्दल धनापासून वंचित करणे (धनाच्या रूपाने दंड भरावयास लावणे) असा त्यांचा शिक्षा देण्यामागील उद्देश होता. आजही दंड करण्यामागे थोडाफार हाच उद्देश असतो. समजा, एखाद्या माणसाने एका प्रतिष्ठित व्यक्तीचा अपमान केला. आता जर त्या व्यक्तीने त्या माणसाविरुद्ध न्यायालयात मानहानीची फिर्याद केली आणि खटला जिंकला तर न्यायालय त्या माणसाला त्या व्यक्तीस मोबदला देण्यास भाग पाडेल. शिक्षा झालेल्या त्या माणसाला आपल्या अपराधाबद्दल अशा प्रकारे अपमानित व्हावे लागेल कारण खटला हारून तो लबाड ठरला; त्याला दंडही भरावा लागला आणि लज्जितही व्हावे लागले. या मर्त्यलोकात माणसाची तसेच समाजाची प्रवृती सूड घेण्याकडे असते. जर पाकिस्थानातील लोकांनी तेथील भारतीय वकिलातीवर हल्ला करून तिचे नुकसान केले तर पाकिस्थानी वकिलातीवर हल्ला करून तिचेही

तसेच नुकसान करावे असे येथील कित्येक लोकांना वाटते. जुन्या काळी असे प्रकार अधिक घडत असत. लोक असे मानत की, अपराध्याला शिक्षा ही झालीच पाहिजे कारण त्यायोगे दुसऱ्याचे नुकसान केल्यास त्याचा परिणाम काय होतो हे त्याला समजेल आणि ज्या व्यक्तीचे त्याने नुकसान केले असेल तीही उट्टे काढू शकेल. प्लेटो वगैरे सारख्या जुन्या काळच्या तत्त्वज्ञान्यांनी तसेच धार्मिक विचारवंतांनीही अशा प्रकारच्या शिक्षेची शिफारस केलेली आहे. त्यायोगे अपराध्यांचे पाप नाहीसे होते असे ते समजत असत. म्हणून ते त्याला पापांतकारी शिक्षा (Expiatory Punishment) असेही मानत असत.

## शिक्षेचा दुसरा उद्देश

अपराध्याला झालेला त्रास पाहून इतर लोकांनी अपराधापासून दूर राहावे हा शिक्षा देण्यामागील दुसरा उद्देश आहे. म्हणून या हेतूने शिक्षेला समाजापुढे उदाहरण कायम ठेवणारी (Exemplary Punishment) असेही म्हणतात. ही एक प्रकारे इतरांना अपराधापासून परावृत्त (Deterrent) करणारी शिक्षा होय. जर एखाद्याने दुसऱ्याचा खून केला तर त्याला जन्मठेपेची शिक्षा दिल्यास तिचा परिणाम इतर लोकांवर होतो. ते भिऊन या अपराधाच्या वाटेला जात नाहीत. तेव्हा इतरांच्यापुढे एक उदाहरण कायम ठेवणारी (Exemplary) तसेच त्यांना पापकर्मापासून परावृत्त करणारी अशी ही शिक्षा आहे. अपराध्याला पुन्हा असे पापकृत्य करता येऊ नये. (Preventive Punishment) आणि त्यायोगे समाजाला त्याच्यापासून संरक्षण मिळावे तसेच त्याच्या कुकर्मांपासून उपद्रव होऊ नये असाही एक उद्देश शिक्षा देण्यामागे असतो. तुरुंगात बंदिस्त राहिल्याने अपराध्याला अशी मोकळीक मिळत नाही की त्याने लोकांचे खिसे कापावे किंवा शहरात दंगल करावी अथवा चिथावणारे भाषण करावे. म्हणूनच अशा अपराध्यांना कारावास दिला जातो. त्यामागे हा हेतू असतो की समाजाने आरामात राहावे आणि शिक्षा भोगून आल्यावर पुढे अपराध्याने अपराध करू नये. एखाद्या अपराध्याला त्याच्या शहरातून हद्दपार करणे, त्याला तेथे भाषण करू न देणे किंवा आपल्या घरातून बाहेर पडण्यासाठी बंदी करणे हे सर्व त्याला पुढे

आणखी अपराध करण्यापासून परावृत्त करावे म्हणून दिलेल्या शिक्षा (Preventive or Deterrent Punishment) होते.

### अपराध्यात सुधारणा

या सर्वांव्यतिरिक्त आजकाल लोकांचा असाही एक दृष्टिकोन होत चालला आहे की अपराध्याला केवळ शिक्षा देऊन भागणार नाही तर त्याला सुधारण्याचेही प्रयत्न करण्यात यावेत. एखादी परिस्थिती, लाचारी, विकृती किंवा सामाजिक स्थिती यामुळे माणूस अपराध करतो, म्हणून त्याला केवळ शिक्षा देणे उचित नाही उलटपक्षी त्याने पुन्हा अपराध करू नये यासाठी त्यास अपराधास प्रवृत्त करणारी कारणे नाहीसी करणे तसेच त्याचे मानसिक स्वरूप सुधारणे हाही शिक्षा देण्यामागे एक उद्देश असावा आणि तुरुंगात आल्यानंतर शिक्षेबरोबर या दृष्टिकोनातूनही काही तरी करावयास हवे असे त्यांना वाटते. अशा लोकांचे असे मत आहे की, हे कार्य झाल्याशिवाय शिक्षा ही इतरांपुढे कोणताही आदर्श किंवा उदाहरण (Example) ठेवत नाही आणि अपराध्यालाही पुन्हा अपराध करण्यापासून परावृत्त (Preventive or Deterrent Punishment) करण्याचे कार्य करीत नाही. अपराधी तुरुंगातून बाहेर आल्यावर पुन्हा अपराध करणे सुरू करतो. ही गोष्ट प्रत्येक देशातील कायदेविषयक संशोधन करणाऱ्या लोकांनी पाहिलेली आहे.

### अपराध्याला अपराधाचा परिचय करून देणे आवश्यक

वर शिक्षेचे चार मान्य झालेले उद्देश आम्ही सांगितले आहेत. या बाबतीत एक महत्त्वपूर्ण व लक्ष देण्यायोग्य अशीही एक गोष्ट आहे की, **कोणत्याही अपराधाची शिक्षा देण्यापूर्वी अपराध्याला त्याचा अपराध काय आहे हे सांगणे हा न्यायव्यवस्थेचा नियम आहे. जर कोणी अपराधी वेडा असेल किंवा वेडाच्या भरात त्याने अपराध केलेला असेल तर त्याला शिक्षा देण्यात येत नाही. याचे कारण स्पष्ट आहे. शिक्षा दिल्याने अपराध्याला आपला अपराध काय आहे हे जर समजलेच नाही तर तो पुढे अपराध करण्याचे थांबविणारच नाही, सुधारणारही नाही आणि इतरांपुढे आदर्शही बनणार नाही.** यावरून असा निष्कर्ष निघतो की जेव्हा अपराध्याची बुद्धी, त्याचे मन किंवा त्याची जाणीव अशा अवस्थेत असेल

की, तो आपला अपराध, त्यामुळे समजाचे होणारे नुकसान तसेच कायदा व न्याय भंग करण्याचा दोष या सर्वांना समजू शकेल तेव्हाच त्याला त्याच्या अपराधाबद्दल शिक्षा देण्याचा हेतू साध्य होईल.

**अपराध्यास दिलेल्या न्यायाबाबतीत एक महत्त्वपूर्ण दृष्टिकोन**

अपराधांचा विशेष अभ्यास केलेले जे तज्ज्ञ लोक आहेत त्यांचे असे मत आहे की, अपराध्याला तुरुंगात पाठवून समाजापासून जे वेगळे करण्यात येते आणि शिक्षण, सुधारणा, बौद्धिक विकास व चारित्रिक उन्नती यांच्या कार्यक्रमांद्वारे लाभ घेण्यापासून वंचित केले जाते हे वास्तविक त्याला **काही न्यायच काय पण अपराधाची खरी शिक्षा देणेही नव्हे.** पुढे पुन्हा त्याने अपराध करू नये म्हणून त्याला शिक्षा करणे हे ठीक आहे परंतु जर त्याला चांगल्या वातावरणात, संस्थांत किंवा स्थानी जाण्यास मज्जाव केला तर पुढे तो अपराध करण्याचे कसे थांबवील ? तो उलट इतर अपराध्यांच्या कुसंगतीत इतर अनेक प्रकारचे अपराध व त्यांच्या पद्धती शिकून घेईल व पक्का अपराधी होऊन बाहेर पडेल. यामुळे समाज त्याला कायमचा गमावून बसेल, आपल्याला एक शत्रू निर्माण करून ठेवील. समाजाचे हे नुकसान नव्हे तर काय ? शिवाय एक अपराध केल्याने त्या माणसाला पुढे चांगला नागरिक बनण्याची संधी देण्याऐवजी लज्जित, तिरस्कृत व दंडित बनवून अपराधी समाजाशी (कैद्यांशी) संबंध प्रस्थापित करण्यास भाग पाडणे हा त्याच्यावर केलेला अन्यायच होय. म्हणून असा विचार करणाऱ्या कायदे पंडितांचे म्हणणे आहे की, ''एक शाळा उघडा व एक तुरुंग बंद करा.'' (open a school and close a prison)

**शिक्षा भोगण्यासाठी मनुष्यात्म्याला काय पशुपक्ष्यादी योनींत जाण्याची आवश्यकता आहे ?**

उपरोक्त सर्व सत्य गोष्टी लक्षात ठेवून आता आपण विचार करू या की, आपल्या पापांची फळे भोगण्यासाठी मनुष्यात्म्याला काय पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म घेण्याची आवश्यकता आहे की हा हेतू मनुष्य योनीतच योग्य रीतीने सिद्धीस जाऊ शकतो ?

न्यायशास्त्र (Jurisprudence)विशारदांचा हा जो विचार आहे की, मनःस्थिती ठीक नसताना केलेल्या अपराधाची शिक्षा अपराध्यास मिळता कामा नये किंवा आपण अपराध केला आहे त्याचे फळ ही शिक्षा आहे आणि आपण पुढे अपराध करता कामा नये याची जाणीव अपराध्यास व्हावी हा शिक्षा देण्याचा उद्देश असावा– **त्याची पूर्ती मनुष्य-योनीतच होऊ शकते ही गोष्ट स्पष्ट आहे. जर आपल्या पापांचे फळ म्हणून माणूस पशुपक्ष्यादी योनींत पुनर्जन्म घेईल तर त्या अल्प बुद्धीच्या व मानसिक ऱ्हासाच्या दशेत त्याला कोण सांगेल, तसेच त्याला कसे समजेल की, पूर्वजन्मी केलेल्या अपराधांचे किंवा पापांचे फळ तो त्या योनीत भोगत आहे** ? या व्यतिरिक्त त्या योनीत त्याला सुधारण्याची संधीही मिळणार नाही. ज्यांचे पालन करण्यास तो शिकेल. असे माणसासारखे कायदे पशुपक्ष्यांत नसतातच. शिकून त्याने सुधारावे म्हटले तर कोणतीही चारित्रिक शिक्षणाची व्यवस्था त्यांच्यात नसते. त्यामुळे त्याची अधोगती होऊन तो पक्का अपराधी बनेल. उदाहरणार्थ, एक माणूस कामवासनेचा दास आहे आणि व्यभिचार करतो असे समजा. याबद्दल शिक्षा म्हणून जर तो कुत्र्याच्या योनीत जन्म घेईल म्हणावे तर तेथे भाऊ-बहिण, माता-पुत्र, पिता-कन्या यांच्यातील भेदाचे ज्ञानही नसते. उलट कुत्र्याची जात ही 'काम-प्रधान' असते. तेव्हा, त्या योनीत जाण्याची शिक्षा मिळाल्यास कोणताच हेतू सिद्धीस जात नाही. त्या शिक्षेमुळे त्या मनुष्यात्म्याला योग्य न्याय दिला गेला, ती शिक्षा दंड–सिद्धांतास अनुसरून आहे आणि समाजास लाभदायक आहे असे काही म्हणता येणार नाही. जर या प्रकारे माणसाला अन्य योनीरूपी तुरुंगात पाठविण्यात येऊ लागले तर सारा मनुष्य–समाजच नाहीसा होईल आणि तो आपले सदस्य गमावून बसेल. ही गोष्ट अस्वाभाविकच म्हणावी लागेल कारण प्रत्येक जातीला आपला क्षय किंवा नाश होऊ नये असे वाटत असते.

### एक उदाहरण

आता समजा, की एका माणसाने दुसऱ्या कोण्या माणसाकडून लाच घेतली किंवा धोका देऊन, फसवून वा अन्य कोणत्याप्रकारे त्याचे पैसे मारले. याची शिक्षा म्हणून जर त्याला पुढच्या जन्मी मांजर-योनी मिळेल तर त्यामुळे

ज्याचे पैसे त्याने मारले होते त्या माणसाला मोबदल्यात काहीच रक्कम मिळणार नाही तसेच स्वतः त्यालाही (पैसे मारलेला माणूस) दंडाच्या रूपाने काहीच पैसे भरावे लागणार नाहीत. म्हणजे दंड किंवा नुकसान भरपाई भरण्यासाठी जी शिक्षा (Retributive Punishment)होते तशी ही शिक्षा झाली असे काही म्हणता येणार नाही. मांजर–योनीत जाण्याऐवजी त्या आत्म्याने एखाद्या गरीबाच्या घरी जन्म घेऊन ज्या माणसाचे त्याने पैसे मारले होते त्याच्या घरी नोकर बनावे व आपल्या मजुरीद्वारे त्याचे नुकसान भरून द्यावे हे केव्हाही चांगलेच आहे. (आपल्याला कित्येकदा असे दिसून येते की, काही नोकर काम अधिक करतात परंतु मालकाकडून त्यांना पुरेसे वेतन मिळत नाही) किंवा तो अपराधी पुढल्या जन्मी काही सत्कर्मांमुळे कोणी धनाढ्य माणूस व्हावा परंतु कोणत्या तरी कारणामुळे (एखाद्या धंद्यात वा अन्य रीत्या) त्याला त्या माणसाला (पैसे मारलेल्या) नफा इत्यादींच्या रूपाने (वा अन्य एखाद्याप्रकारे) तितके पैसे द्यावे लागावे जितके त्याने पूर्वजन्मी त्याचे मारले होते. तेव्हा पाहा, परतफेड करण्यासाठी तसेच नुकसानभरपाईसाठी मनुष्य-योनीतच शिक्षा भोगणे शक्य आहे. पशुपक्ष्यादी योनींत नव्हे. आता आणखीन एक उदाहरण घेऊ या. समजा, एक माणूस एका प्रतिष्ठित व्यक्तीचा अपमान करतो. या पापाचे फळ म्हणून पुढे तो एखाद्या पशु वा पक्षाच्या योनीत पुनर्जन्म घेतो. तेव्हा या प्रकारच्या व्यवस्थेने तो त्या अपमान केलेल्या व्यक्तीची नुकसानभरपाई कशी काय करू शकेल ? करू शकणार नाही हे उघडच आहे. शिवाय तो स्वतःही अपमानित काही होणार नाही. जर त्याला मनुष्य–योनीतच काही शिक्षा होईल (तुरुंगात जाण्याची, दंड भरण्याची किंवा एखाद्या प्रकारे अपमानित होण्याची) तरच प्रायश्चितरूप शिक्षेचा (Retributive Punishment) हेतू साध्य झाला असे मानले जाईल ना ? आणि, आपण नेहमी हे पाहतो की, जगात एखाद्या माणसाचे जेव्हा दुसरा कोणी इसम पैसे मारतो तेव्हा त्याचे धार्मिक स्वभावाचे मित्रही म्हणतात– "अहो, मागल्या जन्मीचा काही हिशेब राहिला असेल, तो आता चुकता होत असेल." तेव्हा स्पष्टच आहे की, सर्वजण ही गोष्ट विवेकयुक्तही मानतात की गेल्या जन्मी केलेल्या वाईट कर्माची शिक्षा मनुष्य-योनीतच मिळते कारण माणसाचे कर्मखाते

इतर माणसांशीच जुळत असते आणि त्याबद्दल शिक्षाही मनुष्य-योनीतच मिळत असल्याने ते कर्मखाते चुकते होऊ शकते.

आता शिक्षेचा दुसरा हेतू विचारात घेऊ या. जर एखादा मनुष्यात्मा वाईट कर्म केल्याचे फळ म्हणून शिक्षा भोगण्यासाठी पशुपक्ष्यादी एखाद्या योनीत पुनर्जन्म घेईल तर इतरांपुढे एखादे उदाहरण (Examplary Punishment) कायम करण्याचा हेतूही साध्य होत नाही कारण कोणाला काय कळणार की तो आत्मा पशुपक्ष्यादी योनीत गेला आणि तेथे त्याला शिक्षा मिळाली? खुद्द अपराधशास्त्र विशारद (Criminologists) ही गोष्ट मानतात की, अपराधाची शिक्षा मिळते हे पाहून लोक त्यापासून धडा घेंत नाहीत. अन्यथा अपराधांची संख्या वाढत गेली नसती. उलटपक्षी लोक जेव्हा एखादा माणूस लुळा-पांगळा, आंधळा, थोटा, मुका, बहिरा, कुष्टी किंवा अत्यंत रोगी असलेला पाहतात तेव्हा ते पापकर्मांपासून दूर राहण्याची प्रेरणा घेतात. जर कोणी पापकर्म करू लागेल तर लोक त्याला म्हणतातही की, "तू दुःखी होऊन मरशील." आपण निर्दोष आहोत हे सिद्ध करण्यासाठी स्वतः माणूसही म्हणतो की, "जर मी हे पापकर्म केलेले असेल तर माझे डोळे फुटोत, जमीन दुभंगून मला आपल्या पोटात घेवो किंवा मी रोगी होऊन मरो." स्पष्टच आहे की, मनुष्य-योनीतच माणसाला आपण केलेल्या पापकर्मांची शिक्षा मिळते आणि हे विवेक तसेच अनुभवाच्या आधारे सर्वजण मानतात. यापासूनच योग्य तो धडा घेऊन लोक सुधारण्याची प्रेरणा घेतात. कोणी मनुष्यात्मा पशुपक्षी झाला वा न झाला हे कळणे अशक्यच आहे तेव्हा त्यापासून धडा घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जर या जन्मी कामुक असल्याने पुढल्या जन्मी तो कुत्रा बनला तर इतरांना त्यापासून प्रेरणा, ती काय मिळू शकेल? कुत्रा बनल्याने उलट तो अधिकच पतित झाला असेच म्हणावे लागले.

## तिसऱ्या दृष्टिकोनातून विचार

माणूस पुढे पापकर्म करण्यापासून परावृत्त व्हावा म्हणून त्याला शिक्षा (Deterrent Punishment) देण्यात येते हा तिसरा हेतू होय. परंतु विचारांती आपणास असे आढळून येईल की, पशुपक्ष्यादी योनींत गेल्याने ते साध्य

होणार नाही. समजा, एखादा माणूस चोरी करून पापकर्म करतो. आता त्याची शिक्षा म्हणून जर त्याला मांजर-योनीत पुनर्जन्म मिळेल तर ती काय खरी शिक्षा झाली? मांजर तर स्वतः चोरून लपून दूध पिते. याऐवजी जर पुढल्या जन्मी किंवा त्याच जन्मी शिक्षा म्हणून एखाद्या अपघातात त्याचा हात निकामी होईल किंवा रोगामुळे तो घरातच पडून राहील तर तो चोरी करू शकणार नाही. म्हणून अपराधाच्या पुनरावृत्तीपासून परावृत्त करणारी शिक्षाही मनुष्य-योनीतच मिळणे संयुक्तिक वाटते.

अशाप्रकारे, स्पष्ट आहे की, दंड-विधान वा न्याय-सिद्धांतानुसारही मनुष्यात्म्यांनी शिक्षा भोगण्यासाठी अन्य योनींत पुनर्जन्म घेणे हे काही तर्कशुद्ध वाटत नाही. तसेच आपण विचार करा की, ज्याला शिक्षा होते त्याला तिची जाणीव व्हावी, तिला त्याने आपल्या अपराधाचे पारिपत्य मानावे हा ती शिक्षा देण्यामागील हेतू असतो. हे सुद्धा मनुष्य-योनीतच शिक्षा मिळाल्यास शक्य होईल. आपण धार्मिक स्वभावाच्या माणसाने रोग, शोक, धनहानी इत्यादी स्थितीत असे म्हणताना ऐकले असाल की, "अहो, काय विचारता, माझे मन फार दुःखी आहे, रोग दुःसाध्य आहे! काय कारावे, माझे दुर्दैव, गेल्या जन्मीचे पाप आता भोगतो झालं." तेव्हा स्पष्टच आहे की, ही माझ्या स्वतःच्या पापकर्मांबद्दलची शिक्षा आहे अशी जाणीव केवळ मनुष्य-योनीतच होऊ शकते. पशुपक्ष्यांत हे 'ज्ञान' असणे शक्यच नाही आणि त्यांना अशी काही जाणीव होत असलेलीही आढळून येत नाही.

# ६. देवता, दैत्य, असुर या काय वेगवेगळ्या योनी आहेत ?

**म**नुष्यात्मा आपल्यामधील काही मानवी स्वभावानुरूप अव्यक्त शक्तींमुळे (Human Faculties) पशू, पक्षी, कीटक इत्यादी योनींत जात नाही. परंतु अज्ञानवश त्याचे संस्कार, विचार वा कर्मे त्या योनीपेक्षाही अधिक तुच्छ कोटीची होऊ शकतात ही गोष्ट विवेकाद्वारे स्पष्ट करता येणे शक्य आहे. तेव्हा प्रश्न उद्‌भवतो की 'मनुष्यात्मा देव-योनी धारण करून स्वर्गात किंवा राक्षस, पशु, पक्षी इत्यादी योनींत भ्रमण करतो' ही जी प्रचलित मान्यता आहे तिचा अर्थ काय आहे? देव-योनी ही एक वेगळी योनी आहे की नाही ?

खोलवर विचार केल्यास आपण या निर्णयाला येऊन पोहोचाल की, संस्कार, विचार आणि कर्म यांच्यावर आधारित अशा कमीतकमी तीन अवस्था मनुष्यात्म्याच्या असतात. सत्य व त्रेता युगांत मनुष्यात्मे सात्विक संस्कारांचे असल्याने वास्तविक देवात्मेच असतात. म्हणून लक्षात असू द्या की, देव-योनी ही काही वेगळी योनी नव्हे परंतु सत्य व त्रेता युगांतील मनुष्यात्मा हा दिव्य गुण संपन्न व सात्विक असतो, त्याची शरीराकृती जरी माणसासारखीच असली तरी त्याचे ते शरीर कामोपभोगाद्वारे नव्हे तर ऊर्ध्वरिता माता-पित्यांचे ब्रम्हवर्चस, तेज किंवा आत्मबल यांद्वारे उत्पन्न होते,ज्याला 'योगज' जन्म असेही म्हणता येईल. तेव्हा देवतांची वेगळी योनी मानणे योग्य नव्हे, त्यांचा वर्ण तथा त्यांची अवस्था (उर्ध्वरिता, सात्विक व पावन अवस्था) वेगळी मानणे संयुक्तिक आहे.

नंतर द्वापर-युगापासून माणसाचा जन्म काम-विकाराद्वारे होण्याचा परिपाठ प्रचलित होतो. अशा जन्माला 'मैथुनी जन्म' असेही म्हटले जाते. मैथुनरूपी कर्माला किंवा काम विकाराला म्हणजे 'स्त्री संभोगाला' कित्येक लोक 'पशु धर्म' असेही म्हणतात, तेव्हा, सत्य व त्रेता युगांत जे देवता होते ते पुण्य क्षीण झाल्यावर किंवा प्रारब्ध समाप्त झाल्यावर द्वापर युगाच्या आरंभापासून 'पशु धर्माकडे' वळले, अर्थात ते कामविकाराच्या अधीन झाले. द्वापर युगाच्या आरंभी तर कामविकार पीठातील चवीपुरत्या मीठाप्रमाणे होता. कालांतराने तो प्रबळ होत

गेला आणि आज कलियुगाच्या अंतिम समयी तर लोक फारच पतित झालेले आहेत. पशू, पक्षी इत्यादी प्राणी तरीही इतके पतित झालेले नसतील जितकी माणसे पतित झालेली आहेत अशी आजची वस्तुस्थिती आहे. अशाप्रकारे, द्वापर युगात पतित अर्थात कामविकाराधीन झाल्यानंतर मनुष्यात्मे पशु-धर्मीय (कामविकारवश) तर झालेच परंतु त्यांनी काही पशुपक्ष्यादी योनींत जन्म नाही घेतला. आमच्या म्हणण्याचा अर्थ हा आहे की ते पशु-बुद्धीचे झाले. अर्थात त्यांचा आहार-व्यवहार इत्यादी पशूंप्रमाणे निकृष्ट झाला आणि आज अशी परिस्थिती झाली आहे की, जसे पशुपक्ष्यांत ईश्वरी ज्ञान तथा दैवी धर्म नसतो तसे लोकही ज्ञानशून्य, धर्मभ्रष्ट व योगभ्रष्ट झालेले आहेत. यावरून असे म्हणता येईल की, मनुष्यात्मा उत्तरोत्तर 'पशुतुल्य' किंवा 'पशुबुद्धी' वा पशु-धर्मीय होत गेला आहे. एका कवीने म्हटलेच आहे की, 'येषाम् न विद्या न तपो न दानं.... ते मृत्यूलोके भुवि भारभूता, मनुष्यरूपेण मृगाश्च रन्ति', अर्थात ज्यांच्यात विद्या, तप किंवा दानवृत्ती इत्यादी नाहीत ते मनुष्यरूपात असूनही जणू काही पशूच होत.

## दुसरे स्पष्टीकरण

दुसरे स्पष्टीकरण असे देता येईल की, सत्य व त्रेता या युगांत आत्म्याचे जितके म्हणून शारीरिक जन्म होते ते सारे दैवी होते कारण ते योगज असल्याने शरीरे पावन होती व स्वभावही दैवी होता. नंतर द्वापर युगात जेव्हा मनोविकार इतके प्रबळ नव्हते आणि माणूस थोडीफार भक्ती, हठयोग, संन्यास, व्रत, तीर्थयात्रा, यज्ञ, शास्त्र-पठण इत्यादी करीत होता तेव्हा त्याचा जन्म वा जीवन 'मानवी' होते. परंतु हळूहळू त्याच्यात कावळ्यासारखी चंचलता, बगळ्यासारखा ढोंगीपणा, कबुतरासारखी अंधश्रद्धा, पोपटासारखी घोकंपटी करण्याची सवय, सापाप्रमाणे इतरांना डंख मारण्याचा (दुःखी करण्याचा) स्वभाव, वाघासारखी हिंस्त्रता, कुत्र्यासारखी कामवृत्ती, उंदरासारखी दुसऱ्यांच्या गोष्टी कुरतडत राहण्याची वृत्ती, पाण्याविना माश्याप्रमाणे तृष्णांच्या मागे तडफडणे वगैरे दुर्गुण येत राहिले. त्याच्यातील दैवीगुण तर जवळ-जवळ लुप्तच झाले. परंतु पशू,पक्षी, कीटक इत्यादी लाखो योनींपैकी कोणत्या ना कोणत्या तरी योनीच्या जीवांसारखा संस्कार त्याच्यात आला. हे वर्णन करताना कोणीतरी असे म्हटल्याची शक्यता

आहे की, "माणूस देवता, मनुष्य, पशू, पक्षी इत्यादी योनींत जन्म घेतो." एक मानवी जीवनात माणूस कित्येक प्रकारचे मानवी स्वभाव धारण करतो, तेव्हा ही गोष्ट लोकांनी अशी वर्णन केली असण्याची शक्यता आहे की, "आत्मा चौऱ्यांशी लक्ष योनी धारण करतो." तसेच माणूस कधी माकडाप्रमाणे पाचही मनोविकारांच्या अधीन होतो तर कधी सत्संगाच्या प्रभावाने कासवाप्रमाणे आपली कर्मेंद्रिये समेटून घेतो तर कधी दिव्यविवेक प्राप्त झाल्यावर हंसाप्रमाणे खोटे बाजूला सारून सत्य असेल ते ग्रहण करतो; तेव्हा कदाचित् या दृष्टिकोनातून कोणीतरी असे म्हटले असण्याची शक्यता आहे की, माणूस पशुपक्ष्यादी लक्षावधी योनी धारण करतो. परंतु हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे की मनुष्यात्मा पशू, पक्षी, कीटक इत्यादींसारखे शरीर कधीही धारण करीत नाही.

द्वापर व कलियुगांतील अत्यंत दूषित मन, वचन व कर्म असणारा आत्मा देहत्यागानंतर दुसरा मानवी देह मिळेपर्यंत काही काळ भूताप्रमाणे संचार करीत असल्याची शक्यता आहे. परंतु भूतांची एखादी वेगळी योनी किंवा एखादा वेगळा जन्म मानणे हे काही संयुक्तिक नाही. वस्तुतः 'भूत' या शब्दाचा अर्थ आहे 'होता' was or had been) अर्थात जो होऊन गेला आहे. स्पष्ट आहे की, होऊन गेलेल्या काळात जो 'माणूस होता' आणि ज्याने अजूनही दुसरा मानवी देह धारण केला नाही त्याच्या केवळ मध्यकालीन अवस्थेचे नाव 'भूत' होय. भूत ही काही वेगळी योनी किंवा जन्म नव्हे.

## असुरांची एखादी वेगळी योनी नाही

त्याचप्रमाणे असुरांचीही एखादी वेगळी योनी नाही तर 'सुर' म्हणजे देवतांच्या विरुद्ध (अ-सुर) लक्षणे असलेले लोकच वास्तविक 'असुर' होत. श्रीमद्भगवद्गीतेत आसुरी लक्षणांचे स्पष्ट वर्णन केलेले आहे. जे लोक तमोगुणी आहेत ते सर्वच वास्तविक असुर होत. परंतु आज स्वतःला 'असुर' मानून ज्ञान व योगाद्वारे 'सुर' (देवता) बनण्याचा प्रयत्न करण्याऐवजी अज्ञानी लोक असे मानतात की असुर पृथ्वीच्या खाली कदाचित एखाद्या नरकात राहतात आणि त्यांची कदाचित एखादी वेगळीच योनी आहे. परंतु वास्तविक असे मानणे चुकीचे आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे गीतेत आसुरी व दैवी लक्षणांचे स्पष्टीकरण दिलेले

असूनही आज कित्येक गीताप्रेमी लोक पशुपक्ष्यादी योनींनाच आसुरी योनी मानण्याची चूक करीत आहेत. (गीता तत्त्व विवेचनी अ. १६, श्लो. २९ चे स्पष्टीकरण). त्याचप्रमाणे दैत्य, दानव वा राक्षस यांच्याही कोणत्या वेगळ्या योनी नाहीत. मानव जेव्हा अत्याचारी व असत्य मार्गांचा अवलंब करतो तेव्हा 'दानव' होतो आणि तोच माणूस जेव्हा मांस-मदिरा तथा विषय-वासना यांत बुडून जातो तेव्हा तो 'राक्षस' म्हटला जातो. ही सर्व तथ्ये जाणल्यानंतर हे मानावेच लागेल की, मनुष्यात्मा ८४ लक्ष योनींतून भ्रमण करीत नाही तसेच देवता, दैत्य किंवा राक्षस यांच्याही कोणत्या वेगळ्या योनी नाहीत, उलटपक्षी मनुष्यात्म्यातच संस्कारांचे परिवर्तन व प्रकारांतर होत असते.

## विचार करा

आणखीन एक गोष्ट विचार करण्याजोगी आहे. "माझे भाग्यच असे आहे, माझे नशीबच असे आहे," असे लोक म्हणताना बहुधा आपण ऐकतो. हे **भाग्य किंवा नशीब म्हणजे काय?** हे कर्मफळ म्हणजे पाप किंवा पुण्याचेच तर फळ होय. तेव्हा, जर माणसाच्या कर्मांचे फळ त्याला मनुष्ययोनीतच मिळतच नसेल तर मनुष्ययोनीत भाग्य, प्रारब्ध, कर्मभोग इत्यादींचा प्रश्न उद्‌भवूच शकत नाही. परंतु वास्तविकता, अनुभव व प्रमाण हे सांगतात की, ज्याप्रमाणे लोकनिर्मित शासक (राजा किंवा न्यायालय) मनुष्य योनीतच माणसाला त्याच्या वाईट कर्मांबद्दल शिक्षा देतो आणि मनुष्य योनीतच त्याला इनाम, पारितोषिके किंवा बक्षिस देतो त्याचप्रमाणे शाश्वत कायदाही असा आहे की, मनुष्यात्म्याला आपल्या कर्मांचे बरे-वाईट फळ मनुष्य-योनीतच मिळते.

तेव्हा मनुष्ययोनी ही केवळ कर्मयोनीच नव्हे तर भोगयोनीही आहे. अन्यथा लोक सर्व सुखी असते आणि पशू, पक्षी इत्यादी सर्व दुःखी असते. जर मनुष्यात्मे आपल्या वाईट कर्मांचे फळ म्हणून पशुपक्ष्यादी योनींत भ्रमण करीत असते तर आज लोकसंख्या वाढत गेली नसती उलट फारच कमी झाली असती कारण या कलियुगात तर बहुधा सर्वच मनुष्यात्मे अधिकतर पापकर्मेच करीत आहेत.

# ७. अमृताद्वारे मृत्यूवर विजय ; अमर पदाची प्राप्ती

दीर्घकाळापासून लोक मृत्यूवर विजय प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत आले आहेत. वैज्ञानिक संशोधनाचा प्रारंभही मृत्यूला जिंकण्याच्या उद्देशाने झाला होता असे लोकांचे म्हणणे आहे. ज्यायोगे आपण मृत्यूवर ताबा मिळवू शकू असे रसायन (Elixir) बनविण्याची आवश्यकता माणसाने फार पूर्वीच जाणली होती ते रसायन बनवू शकण्यापूर्वीच माणसाने त्याला 'अमृत' हे नावही देऊन टाकले. परंतु आजतागायत ते रसायन माणसाच्या हाती लागलेले नाही. असे रसायन बनविणे तरी कसे शक्य आहे ? प्रत्यक्ष प्रकृतीच विनाशी आहे. त्यापासून बनविलेले कोणतेही रसायन माणसाची मरणधर्मी प्रकृती (देह) अमर किंवा अविनाशी कशी बनवू शकेल ?

तेव्हा आजही अनेक डॉक्टरांच्या किंवा वैद्यांच्या उपस्थितीत आणि अनेक औषधे असूनही माणसू मृत्युपीडेने प्राण सोडतो अथवा अचानक त्याची हृदयक्रिया बंद पडते. विज्ञानाने अनेक शोध लागले आहेत परंतु त्या शोधांनी मृत्यूवर विजय मिळविण्याचे तर सोडाच पण कित्येकदा अपघात, दुर्घटना आणि मृत्यू मात्र घडतात. विज्ञानाने मृत्यूवर विजय प्राप्त करण्याचा कोणताही उपाय अजूनही शोधून काढलेला नाही. उलट ॲटम, हायड्रोजन व न्यूट्रॉन बॉंबस्च्या रूपाने सृष्टीच्या महाविनाशाची किंवा महामृत्यूची साधने मात्र निर्माण करून ठेवली आहेत.

### सांप्रत येथे रामाचे नव्हे यमाचे राज्य आहे

मृत्यूपासून सुरक्षित राहण्यासाठी विज्ञानाच्या आधाराव्यतिरिक्त जप, तप, यज्ञ, कर्मकांड इत्यादींचाही आधार लोक घेतात. परंतु इतके करूनही मृत्यू तर येतोच येतो. यमाचा फास तर प्रत्येकाच्या गळ्याला लागलेलाच आहे. एक दिवस 'जावे' लागेल हे सर्वजण जाणून आहेत. कोणत्याही माणसाच्या चेहऱ्यावर पूर्ण व सदास्थायी असा आनंद दिसून येत नाही कारण कोणी मानो न मानो सर्वांवर मृत्यूची छाया पडलेलीच आहे. यात लहान-मोठा असा भेद नाही.

बापापूर्वीच मुलाला मृत्यू येतो. अकाली मृत्यू झडप घालतो आणि नियतीत कोणीही माणूस हस्तक्षेप करू शकत नाही. जगात कोणत्याही माणसाचा कितीही मान असो परंतु एक दिवस त्याला मृत्युमुखी हे पडावेच लागते. साप्रंत येथे कोणाचेही राज्य नाही, फक्त यमाचेच राज्य आहे. रामाचे तर नाही पण 'राम नाम सत्य आहे' अशी घोषणमात्र कोठे ना कोठे ऐकू येते. काळाच्या पिंजऱ्यात्त किंवा पंज्यात सर्व अडकून पडलेले आहेत म्हणून या लोकास 'मृत्यूलोक' असेही म्हणण्यात येते कारण येथील सर्व प्राणिमात्रांना एक दिवस मरावयाचे आहे. जन्म-मरणाच्या दुःखापासून कोणीही येथे सुटू शकत नाही. मृत्यूवर सर्वांचाच विश्वास आहे. तेव्हा यमाच्या फासापासून कसे सुटावे असा विचार सुज्ञ माणूस करीत आहे.

## मृत्यूची पीडा का भोगावी लागते ?

मृत्यूच्या पीडेचे कारण काय आहे हे जेव्हा आपण योग्य रीतीने जाणून घेऊ तेव्हाच त्यापासून सुटण्याचा पुरुषार्थ योग्य रीतीने होऊ शकेल. आपण पाहतोच की, या जगात जेव्हा कोणी माणूस दुसऱ्या कोण्या व्यक्तीशी घातक हिंसेचा व्यवहार करतो किंवा देशद्रोह करून आपल्या देशबांधवांना दुःख देतो तेव्हा सरकार कायद्यानुसार त्याला मृत्यूदंड देते. यावरून मृत्यू हे आपल्या खोट्या कर्मांचे फळ होय हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे रोग, अपघात इत्यादींमुळे माणसाला जो मृत्यू येतो हेही ईश्वरी सरकारच्या नियमांविरुद्ध आचरण केल्यांचे फळ होय. जर इहलोकी माणूस श्रेष्ठ कर्म करील आणि कामक्रोधादी विकाराधीन होऊन पाप न करील तर त्याला ही शिक्षा भोगावी लागणार नाही.

हे मनोविकारच माणसाला मृत्यूमुखी लोटून देतात. याची बरीच उदाहरणे आपल्यासमोर घडत असलेली आपण पाहतो. कामविकाराच्या अधीन होऊन हत्ती कागदी हत्तीणीच्या मागे लागतो आणि खड्ड्यांत पडून कायमचा बंदीवान होतो. भ्रमर फुलाच्या सुगंधावर मोहीत होऊन त्याचा रस चाखत बसतो परंतु जेव्हा रात्र होते तेव्हा फुलाच्या पाकळ्या मिटतात आणि आत भ्रमर तसाच राहतो व मरतो. पतंग ज्योतीवर मुग्ध होतो व काही एक न पाहता तिच्यात जळून मृत्यू पावतो. तेव्हा हे स्पष्ट आहे की कर्मेंद्रियांच्या अधीन होऊन विषयांच्या मागे

भिकाऱ्याप्रमाणे धावणारा माणूसही मृत्यूमुखी पडतो. आपल्या बेतालपणाचे फळ त्याला मृत्यूच्या रूपाने मिळते.

देशाचे सरकार तर मृत्यूहून मोठी शिक्षा अपराध्याला देऊ शकत नाही परंतु विकारवश होऊन दुःख देण्याच्या उद्देशाने अपराध करणाऱ्या माणसाला मृत्यूची शिक्षा तर मिळतेच पण त्यानंतरही त्याला गर्भ-जेलची शिक्षा भोगावी लागते. एवढ्यावरच त्याची सुटका होत नाही तर पुढील जन्मीही त्याच्या पापांचे फळ त्याला दुःखाच्या रूपाने मिळते आणि शेवटी यमपुरीतही त्याला यातना भोगाव्या लागतात, म्हणून एखाद्या प्रकारे मृत्यूस जिंकल्यास माणूस ना केवळ मृत्युसमयीच्या यातनांपासून सुरक्षित राहतो पण नंतर गर्भ-जेलात मिळणाऱ्या दुःखापासूनही मुक्त होतो. अर्थात मुक्ती व जीवनमुक्ती प्राप्त करतो.

## जीवनमुक्तीचा अर्थ काय आहे ?

मुक्तीच्या अवस्थेत माणूस शरीरापासून मुक्त असतो आणि निष्क्रिय असतो. परंतु जीवनमुक्तीच्या अवस्थेत तो देह धारणही करतो आणि त्याचा त्यागही करतो पण तसे करताना त्याला किंचितही दुःख होत नाही. जन्म व मृत्यू दोन्ही दुःखरहित व सुखसहित होतात.

सध्या ज्या लोकात आपण आहोत त्याला 'मृत्युलोक' असे म्हणतात. जीवन्मुक्तीचा अधिकार प्राप्त झाल्यावर माणूस ज्या लोकी जातो त्याला 'अमरलोक' किंवा 'देवलोक' असे म्हणतात. देवता दुःखदायक जन्म-मरणाच्या बंधनात नसतात. हे जे प्रसिद्ध आहे की श्रीनारायणाचे स्मरण करणारे यमाच्या पंज्यापासून सुटतात तर श्रीनारायणाच्या राज्यात एखाद्याला यमदूतांकडून पीडा मिळणे कसे शक्य आहे ? म्हणून देवता जीवन्मुक्त असतात; त्यांच्या त्या अवस्थेलाच 'अमरपद' असे म्हणतात. देह तर देवताही त्यागतात व धारण करतात परंतु तसे करताना त्यांना किंचितही दुःख होत नाही. म्हणूनच त्यांना 'जीवन्मुक्त' मानले जाते.

तेव्हा मृत्यूला जिंकण्याचा अर्थ म्हणजे मुक्ती व जीवन्मुक्ती प्राप्त करणे, माणसापासून देवता बनणे, मृत्युलोकातून अमरलोकात जाणे अथवा नरकातून स्वर्गांत जाणे होय. प्रसिद्धच आहे की स्वर्गांत किंवा वैकुंठात आदी, मध्य व अंत या तिन्ही काळात दुःख नसते.

# ८. परमात्म्याकडून कोणते अमृत मिळते ?

अमृत प्राशन केल्यास माणूस अमर होतो ही गोष्ट प्रसिद्ध आहे. पण ते अमृत कोणते व ते देणारा वैद्य कोण हे काही लोकांना माहीत नाही. आज वैद्यांनी अमृतधारा तयार करून ठेवली आहे, देवतांच्या मूर्तींच्या चरणांवर पाणी शिंपडून पुजारी लोक चरणामृतही प्यावयास देतात. परंतु जन्म-मरणात येणाऱ्या माणसाने प्राकृतिक तत्त्वांपासून हे जे 'अमृत' बनविले आहे त्याने माणूस अमर कसा होऊ शकतो ही गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे. खरे अमृत तर 'अमरनाथ' (शिव) परमपिता परमात्म्याचे गीता-ज्ञानच होय.

गीतेच्या भगवंतांचे महावाक्य आहे की, "या ज्ञानाद्वारे माणूस महामृत्यूच्या भयापासून सुरक्षित राहील, स्वर्गाचे स्वराज्य प्राप्त करील आणि 'श्री' हे देवपद तथा मृत्यूवर 'विजय' मिळवील अर्थात 'अमर' (देवता) पद प्राप्त करील." जेव्हा माणूस मरावयास टेकतो तेव्हा त्याला गीता-ज्ञान ऐकवितात, इतर सर्व औषधे देणे बंद करतात. गीता ऐकल्याने माणूस स्वर्गाला जाईल असे त्यांना वाटते. परंतु त्यावेळी तो माणूस गीता-ज्ञान धारण थोडेच करू शकेल ?

जो माणूस गीता-ज्ञान जीवनात धारण करून आपले जीवन पवित्र करतो त्याच्यासाठी मृत्यू हा निश्चितच एक पूल आहे, ज्याद्वारे तो मृत्यूलोक पार करून अमरलोकास जातो किंवा स्वर्गवासी होतो. पण जन्म-मरणात येणारी माणसे जे गीता-ज्ञान ऐकवितात त्याद्वारे ही आशा पुरी होऊ शकत नाही उलटपक्षी परमात्मा स्वतः अवतरित होऊन जे गीता-ज्ञान देतो तेच अमृत होय आणि त्याद्वारेच माणूस स्वर्गात अमर पद प्राप्त करतो.

# १. मृत्यूला कसे जिंकावे ?

परमपिता शिव परमात्मा ज्ञानामृत पाजून आणि दिव्य गुणांची व ब्रह्मचर्य व्रताची शिकवण देऊन लोकांना तीन प्रकारे मृत्यूवर विजय प्राप्त करावयास लावतो.

एक तर तो ज्ञानामृताद्वारे माणसाला इतका लायक व गुणवान बनवितो की देहत्यागानंतर त्याचे नाव व कीर्ती कायम राहते. परमात्म्याच्या ज्ञानाधारे माणूस शरीर व कर्मेंद्रियांद्वारे अशी श्रेष्ठ कर्मे करतो की त्याचे स्तवन केले जाते. प्रजापिता ब्रह्मा व जगदंबा सरस्वती किंवा श्रीकृष्ण व श्रीराम यांची उदाहरणे आपल्यासमोर आहेतच. आजतागायत त्यांचे किती स्तवन होते ! त्यांची किती स्मारके उभारली आहेत !! ईश्वरी ज्ञानामृताचे प्राशन व श्रेष्ठ कर्मे केल्याविना जे लोक देहत्याग करतात त्यांचे स्तवन-पूजन होत नाही. जास्तीत जास्त वर्षातून एकदा त्यांची स्वतःची मुले, नातवंडे त्यांचे स्मरण करतात एवढेच ! एक-दोन पीढ्यानंतर तर त्यांचे इतकेही कोणी स्मरण करीत नाही, स्तवन व पूजनाची मग गोष्टच सोडा. परंतु श्रीकृष्ण, श्रीराम इत्यादींचे लोक रोज सकाळी उठताच स्मरण करतात आणि पीढ्या न पीढ्या हा रिवाज चालतो. म्हणून एखादा माणूस मेल्यानंतरही त्याला स्मशानात नेताना 'श्रीकृष्ण नाम सत्य आहे,' 'श्रीराम नाम सत्य आहे' अशा घोषणा लोक देत जातात. त्यांनी आपल्या देहांचा त्याग केल्यानंतर त्यांचा नावलौकिक होत आला आहे असे नव्हे तर इतर कोणी मेल्यानंतरही 'श्रीकृष्ण' व 'श्रीराम' ही नावेच 'सत्य' म्हटली जातात.

त्यांची नावेच काय पण त्यांच्या देहांचीही स्मारके (मूर्तींच्या रूपाने) मंदिरांत स्थापन करून त्यांच्या देहांचीही पूजा केली जाते कारण त्या देहांद्वारे त्यांनी पवित्र जीवन व्यतीत केलेले असते किंवा श्रेष्ठ कर्मे केलेली असतात. त्यांच्या गुणांचेही कवितांच्या रूपाने गायन व कीर्तन होते. त्यांच्या जन्मस्थान इत्यादींनाही लोक तीर्थक्षेत्र मानतात. त्यांच्या श्रेष्ठ कर्तव्यांना 'चरित्र' मानून लोक त्यांचीही चित्रे बनवितात आणि ग्रंथाच्या रूपाने त्यांच्या कथा लिहितात. देहत्यागानंतरही दरवर्षी त्यांची जयंतीही साजरी करतात. सरकारही त्यांची मंदिरे

पाडू शकत नाही. साऱ्या देशाचे लक्ष त्या मंदिरांकडे असते आणि जर कोणी ती पाडण्याचा प्रयत्न करू लागला तर हजारो स्त्री–पुरुष त्यांचे रक्षण करण्यासाठी आपले प्राणही देण्यास तयार होतात. अशा प्रकारे त्यांचे नावनिशाण नष्ट होत नाही उलट ते अमर होते. माणसाचे अस्तित्व नष्ट करू पाहणाऱ्या मृत्यूवर जणू काय ते विजय प्राप्त करतात. जरी त्यांचा स्थूल देह अस्तित्वात राहत नसला तरी त्यांची आठवण लोकांच्या हृदयात जिवंत राहते.

दुसरे म्हणजे परमपिता परमात्म्याद्वारे मिळणाऱ्या ज्ञानामृताचे प्राशन केल्याने, ब्रह्मचर्य व्रत आचरल्याने, तसेच योगाभ्यास केल्याने माणसाला देहत्याग करताना दुःख वा पश्चाताप होत नाही कारण एक तर पश्चाताप होईल अशी पापकर्मे त्याने केलेली नसतात आणि दुसरे म्हणजे सहज आपले वस्त्र उतारावे किंवा सर्पाने कात टाकावी त्याप्रमाणे तो आपल्या देहाचा त्याग करतो. ज्ञानामृताचे सेवन व योगाचा अभ्यास करणारा माणूस आपल्यास जणू काय ईश्वर पोटाशी धरीत आहे असा अनुभव करतो. जसा एखादा प्रवासी सहजपणे धर्मशाळा सोडून आपल्या घरात जाऊन आराम करतो तसेच तोही सृष्टीरूपी धर्मशाळा सोडून आपल्या परमधाम मुक्कामी जाऊन पोहचतो किंवा एखाद्या माणसाला नोकरीत बढती मिळाल्याने जसा आनंद होतो तसेच स्वतःला परमपिता परमात्म्याच्या धामाला जात असलेला पाहून अथवा देवपदाच्या रूपाने बढती मिळत असलेली पाहून, देहत्याग करताना त्याला आनंदच होतो. इतर लोक मृत्यूला घाबरतात कारण त्यांनी पापकर्मे केलेली असतात.

तिसरे, परमपिता परमात्म्याच्या ज्ञानाने जी गती (मुक्ती) व सद्‌गती (जीवन्मुक्ती) प्राप्त होते, त्यात मृत्यूचे भय, कष्ट इत्यादी होत नाहीत. याच कारणामुळे लोक मुक्ती व जीवन्मुक्तीच्या प्राप्तीसाठी पुरुषार्थ करू इच्छितात तेव्हा, अमरपदाची प्राप्ती शक्य व्हावी म्हणून माणसाने आता ज्ञानामृत प्राशन करावे, ब्रह्मचर्य व्रत आचरावे आणि योगाभ्यासी बनावे.

## मृत्यूपासून कोण सोडवू शकतो

जो मृत्यूहूनही बलवान–मृत्युंजय असेल तोच मृत्यूपासून सोडवू शकेल. जो '**काळांचाही काळ**' असेल तोच काळापासून सुरक्षित राहू शकेल. कर्मांची गुह्य

गती जाणणारा व स्वतः त्यांच्या बंधनापासून सदा मुक्त असणाराच कर्मफळ व कर्मबंधन यांपासून मुक्तता करू शकेल. जो देवांचाही देव असेल तोच माणसाला देवता बनवू शकेल. तेव्हा ही एक गोष्ट पक्की लक्षात ठेवावयास हवी की, इतर अनेक प्रकारची दाने अथवा मदत भले कोणी माणूस देऊ शकत असेल परंतु मुक्ती व जीवन्मुक्तीचा दाता एक परमपिता-परमात्माच आहे. म्हणूनच एक परमपिता परमात्म्यालाच 'मृत्युंजय' किंवा 'अमरनाथ' म्हणण्यात येते. अन्य कोणालाही या उपाधी देता येणे शक्य नाही. भक्त लोक परमपिता परमात्म्यालाच म्हणतात की, 'हे प्राणदाता, हे जहाँपनाह, हे शरणदाता आमचे रक्षण कर !'' 'अतिशय सुख देणारा पिता' हेही केवळ परमात्म्यालाच म्हटले जाते. म्हणून 'काल-कंटक दूर करणारा पिता' केवळ परमात्माच (शिव) आहे.



# १०. मृत्यूनंतर प्रत्येक माणसाबरोबर जाते एक वळकटी आणि एक पोते

**शि**कंदर जेव्हा मेला तेव्हा त्याचे हात रिकामे असल्याचे दाखविण्यासाठी ते त्याच्या प्रेतावर झाकलेल्या वस्त्रातून बाहेर काढण्यात आले होते. कारण मृत्यूनंतर माणूस रिकाम्या हातांनी जातो असे लोक मानतात. परंतु खरी गोष्ट अशी आहे की, प्रत्येक माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्याबरोबर एक वळकटी व एक पोते जाते. आपण विचारात पडला असाल की मेलेल्या माणसाबरोबर एक वळकटी व एक पोते जात असलेले आपण कधी पाहिले तर नाही.

या जगाला एक धर्मशाळा म्हटले जाते हे आपण जाणता आणि जेव्हा एखादा माणूस मरतो तेव्हा त्याच्याविषयी लोक म्हणतात की, 'तो हे जग सोडून गेला आहे' (He has departed) आगगाडीतून आपण जेव्हा एका शहरातून दुसऱ्या दूरच्या गावी जातो तेव्हा आपल्याबरोबर एक सामानाचे पोते व एक वळकटीही घेऊन जातो. तसेच हा मनुष्यात्मारूपी प्रवासी जेव्हा देह-गेह सोडून रवाना होतो तेव्हा तोही आपल्यांबरोबर एक पोते व एक वळकटी घेऊन जातो.

**मृत्यूनंतर कोणते पोते व कोणती वळकटी माणसाबरोबर जाते?**

मेल्यानंतर माणूस पोत्यात घेऊन जातो आपल्या मनोवृत्ती किंवा बुद्धीचा विस्तार. माणसांच्या वळकटीत डोके टेकण्यासाठी जशी एक उशी असते तसेच मनुष्यात्मा पुढील जन्मासाठी आपल्याबरोबर बौद्धिक प्रवृत्ती, मनोवृत्ती व स्वभाव यांची एक उशी बनवून घेऊन जातो आणि त्याच्यावर पुढील जन्मी त्याचे बोलणे व वागणे डोक्याप्रमाणे टेकलेले असते. एखाद्या प्रवाशाची उशी जशी स्वच्छ, सुंदर व कोमल असते आणि दुसऱ्या एखाद्याची मळकट व घाणेरडी असते त्याचप्रमाणे एखाद्या आत्म्याची उपरोक्त उशी अर्थात बोलणे व वागणे कोमल, पवित्र व सुंदर तर एखाद्याचे रानटी माणसासारखे असते. प्रत्येकाच्या बुद्धीची एखादी उशी, एखादा आधार किंवा एखादे ठिकाण जरूर असते.

तसेच प्रवाशाचा बिछाना हा मऊ गादीचा, कडक चटईचा किंवा साधारण कपड्याचा वा गोणपाटाच जरूर असतो, ज्यावर तो झोपतो किंवा बसतो, तसेच मृत्यूनंतर मनुष्यात्मा कर्मरूपी ताणाबाणा (उभ्या-आडव्या सूताची वीण) किंवा पूर्वाभ्यासरूपी ठिकाण बरोबर घेऊन जातो, ज्यावर त्याचे जीवन टेकलेले असते व ज्यावरच त्याचे भोग्य-भाग्याचे बसणे होत असते.

**आता वळकटी गुंडाळा, परमधामास जावयाचे आहे**

हे जग म्हणजे एक धर्मशाळा आहे, येथून आपणास निघून जावयाचे आहे असे लोक म्हणतात. परंतु निघून कोठे जावयाचे आहे आणि कधी जावयाचे हे मात्र त्यांना काहीच माहीत नाही. ज्याला जावयाचे असते तो तर जाण्याच्या तयारीला लागतो, आपले पोते-वळकटी बांधावयास लागतो. आपली उशी-चादर आवरून घेतो. परंतु आज माणसाकडे पाहिले असता त्याला जणू कोठे जावयाचेच नाही असे दिसते. मला धर्मशाळेतून निघून जावयाचे आहे हे तो केवळ सांगण्यापुरतेच म्हणतो. वास्तविक पोते-वळकटी आवरून घेण्याचा विचारही तो करीत नसतो.

परंतु सांप्रत जगाची परिस्थितीच हिरवा कंदिल दाखवीत इशारा देत आहेत की, आता परमधामास जाण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सध्या या जगात राहिले तरी काय आहे? सांप्रत ही सृष्टीरूपी धर्मशाळाच नष्ट होणार आहे. फार मोठा डोंगर फोडावयाचा झाल्यास हातोडीऐवजी जसा सुरुंग उपयोगात आणतात तसेच या विराट सृष्टीच्या महाविध्वंसासाठीच हे ॲटम व हायड्रोजन बॉम्ब्स् बनविण्यात आले आहेत कारण या जराजर्जर सृष्टीचा विनाश घडवून येथे सत्ययुगी सुखधाम स्थापन करण्यात येणार आहे. तेव्हा आता जावयाचे तर सर्वांनाच आहे. 'राम गयो, रावण गयो, जाको बहु परिवार' अशी परिस्थिती झालेली आहे, म्हणून आता प्रत्येकाला आपले पोते-वळकटी सांभाळावयास हवी. आपला बुद्धियोग चारी बाजूंनी आवरून बांधावयास हवा. आणि पोत्यात चांगलेच संस्कार भरावयास हवेत. अन्यथा एखादा माणूस जसा निषिद्ध वस्तू (Contraband or prohibited goods) अफू, दारू इत्यादी घेऊन जात असताना मार्गात त्याची तपासणी होऊन पकडला गेला तर त्याला शिक्षा होते तसेच

कामक्रोधादी विकारांचे संस्कार माणूस घेऊन जाईल त्याला यमपुरीत तपासणी झाल्यावर शिक्षा भोगावी लागेल. येथेही काळ त्याची चामडी सोलून काढील, तेथेही त्याला यमाचे भय वाटेल याचा फायदा काय ? म्हणून आता हीच वेळ आहे की माणसाने चांगल्या संस्कारांचे पोते आणि योगाची वळकटी बांधून घ्यावयास हवी. सुख देणारे त्याचे हेच सामान त्याला मार्गातही आणि पुढेही उपयोगात येईल.



## ११. मृत्युपूर्वी काय ?

**मा**णूस जेव्हा मृत्युशय्येवर पडलेला असतो तेव्हा त्याचे आप्तमित्र त्याच्या तोंडात गंगाजळ घालीत त्याला गीता ऐकवित असतात. असे केल्याने माणूस स्वर्ग प्राप्त करतो अशी त्यांची श्रद्धा आहे. परंतु विचार करण्याजोगी गोष्ट आहे की, त्यावेळी त्याची इंद्रिये शिथिल आणि विचारशक्ती व बुद्धी मंद झालेली असतात; तेव्हा अशा परिस्थितीत त्याला गीता वाचून ऐकविल्याने, त्याच्या कानांत ओम्....ओम् म्हटल्याने किंवा त्याला शिव, श्रीकृष्ण, श्रीनारायण इत्यादींची चित्रे दाखविल्याने काय होणार? त्या समयी त्याचे विकारी संस्कार तर बदलू शकणार नाहीत तसेच त्याची स्मृतीही परमपिता परमात्म्यावर एकाग्र होऊ शकणार नाही कारण तसा त्याला अभ्यास नसल्याने ती चंचलच राहील. म्हणून माणसाने आपल्या मृत्युसमयापूर्वीच, जेव्हा तो चांगल्या अवस्थेत असतो तेव्हा परमपिता परमात्म्याचा तसेच आत्म्याचा स्पष्ट परिचय प्राप्त करून घेऊन परमात्म्याशी योगयुक्त होण्याचा सहज अभ्यास करावयास हवा. त्याने हेही जाणावयास हवे की, वास्तविक या स्थूल गंगाजळाने आत्मा पावन होत नाही तर कलियुगाच्या अंती परमपिता शिव परमात्मा अवतरित होऊन प्रजापिता ब्रह्म्याद्वारे ज्या कन्यामातांना ईश्वरी ज्ञान देतो आणि राजयोग शिकवितो त्याच ज्ञान-गंगा होत, त्यांच्याकडून ज्ञान घेणे म्हणजेच पतिताचे पावन होण्याची साधना करणे होय. त्या ज्ञानाच्या आधारे परमपिता शिव परमात्म्याच्या स्मृतीत एकाग्र होण्याचा रोज अभ्यास केल्याने तसेच नराचा श्रीनारायण बनण्याचा उद्देश सदैव आपल्यासमोर ठेवून दिव्य गुण धारण केल्यानेच माणसाला मुक्तीची तथा स्वर्गाची प्राप्ती होऊ शकते कारण जीवन-काळात पवित्र बनल्याने, दिव्य गुण धारण केल्याने तसेच योगाभ्यास केल्यानेच माणसाची अंतकाळी वृत्ती व मती अशी होते की तो मुक्ती व जीवन्मुक्तीला प्राप्त होऊ शकतो.

त्याचप्रमाणे आपण पाहत असाल की, जेव्हा एखादा माणूस मृत्यू पावतो तेव्हा त्याचा आत्मा भटकू नये म्हणून त्याचे नातेवाईक एक दिवा तेवत ठेवतात. परंतु आत्म्याला स्वर्गाचा किंवा परलोकाचा मार्ग दाखविण्यास हा स्थूल दिवा उपयोगी पडणे शक्य आहे काय? छे, छे, त्यासाठी जीवन-काळात प्रत्यक्ष

आत्मारूपी दीपकाला ज्ञान-योगाच्या साधनाने प्रज्वलित करणे आवश्यक आहे. आज जे लोक हरिद्वारास जातात ते फुलांची एक नाव किंवा एक द्रोण फुलवाल्याकडून विकत घेतात आणि त्यात एक दिवा ठेवून तो गंगेच्या प्रवाहात सोडून देतात. ज्याच्या नावेतील दिवा काही क्षणातच विझतो 'तो स्वर्गास जाणार नाही' तर ज्याचा दिवा तेवत दूरवर नावेतून तरंगत जातो 'तो सरळ स्वर्गास जाईल' असे बघणारे लोक म्हणतात. या मागेही एक रहस्य आहे. जेव्हा एखादा माणूस आपली जीवनरूपी नाव या जगात दिव्य-गुणरूपी फुलांनी सजवून आत्मारूपी दिवा असा काही तेवत ठेवतो की, तो प्रलोभनांच्या व संकटांच्या रूपाने येणाऱ्या वाऱ्याने विझत नाही तेव्हा तो माणूस निश्चितच स्वर्गास जातो. याउलट ज्याचा आत्मारूपी दिवा विझतो त्याची जीवनरूपी नाव खरोखरच बुडते आणि तो नरकगामी होतो.

तसेच आपण हेही पाहत असाल की जेव्हा कोणी व्यक्ती मरण पावते तेव्हा तिचे आप्त-मित्र तिचे शव स्मशानात घेऊन जात असताना 'राम नाम सत्य आहे, सत्य बोला गत आहे' असा घोष करत असतात आणि स्मशानाजवळ येताच ते शवाची दिशा बदलतात म्हणजे त्याचे पाय शहराकडे व तोंड स्मशानाकडे वळवितात. वास्तविक मृत्युपूर्वीच 'राम नाम सत्य आहे' किंवा 'शिव नाम सत्य आहे' हे स्मृतीत ठेवावयास हवे, तेव्हा सर्व लोक तन, धन व मनोविकारांच्या धंद्यांमागे लागलेले असतात आणि जेव्हा प्राण निघून जातो तेव्हा तो ऐकूही शकत नाही. म्हणून जिवंत असतानाच माणसाचे पाय शहराकडे व तोंड स्मशानाकडे वळवावयास हवे म्हणजे जिवंतपणीच मोह-ममतेचा त्याग करून अनासक्त वृत्तीने राहावयास आणि त्याकडे लक्ष द्यावयास हवे. परंतु आश्चर्य म्हणजे माणूस दुसऱ्यांना मरत असलेले पाहत असूनही वारंवार आपल्या मृत्यूविषयी मात्र विसरत राहतो आणि आपल्या मार्गाने भटकत विषय-विकारांत पडून राहतो, 'राम नाम सत्य आहे' इत्यादी घोषणांचा जो अर्थ आहे, गीता-ज्ञानाचा जो अभ्यास आहे, ज्ञान-गंगारूपी अमृत हे जे पेय आहे, आत्मरूप दिवा प्रज्वलित करण्याचा तसेच शहराकडे पाय करण्याचा जो उपाय आहे, हे सर्व वास्तविक मृत्युपूर्वीच उपयोगात आणावयास हवेत. परंतु जगाची ही कशी उलटी चाल आहे बघा की त्या सर्वांचा उपयोग मृत्यूनंतरच केला जातो.

# ज्ञानाने खूप शृंगार करा,
# आता जाणे आहे वैकुंठा।

**ब**दला अपुली वस्त्रे पुराणी, काळ नवा आला पाहा तरी।
लक्तरांतच तसे राहू नका, जाऊ चला राजदरबारी॥

प्रेमरूप द्या कामशत्रुला, विसरा प्रदीर्घ * वैर-भावना।
क्रोधाला दिव्य तेजात बदला, चिरस्थायी, अखंड स्वराज्य आणा॥

लोभ त्वरित मग बदलेल, दैवी गुणांची करा धारणा।
मोह-बंधन तर तुटुन पडेल, शिव पित्याचे नाते माना॥

अहंकाराची पळेल माया, स्थिर करा निज स्वरूपनिष्ठा।
ज्ञानाने खूप शृंगार करा, आता जाणे आहे वैकुंठा॥

---

* अर्धे कल्प

# १२. मग कराल तरी कधी ?

**मा**णूस आणि इतर प्राणी यांमधील एक फरक हाही आहे की माणसात बुद्धी अधिक आहे. बुद्धीच्या साहाय्याने माणसाने मोठमोठे शोध लावले आहेत, खाणपान व राहणीच्या पद्धतींत प्रगती केली आहे आणि प्राकृतिक तत्त्वांना आपल्या ताब्यात आणण्याचे प्रयत्न केले आहेत. बुद्धीच्या जोरावर माणूस इतर प्राणिमात्रांवर तर राज्य करतोच परंतु अशीही कित्येक माणसे आहेत की जी इतर कोट्यवधी माणसांवर राज्य करतात, त्यांच्या विचारांना वळण लावून जगात मोठमोठ्या क्रांत्या घडवून आणतात. तसे पाहिले तर माणसाच्या सुखदुःखाचा संबंधही त्याच्या बुद्धीशी आहे कारण सुख वा दुःखरूपी प्रारब्ध माणसाला आपल्या कर्मांमुळेच मिळते. कर्म करण्यापूर्वी माणसाच्या मनात संकल्प उत्पन्न होतो आणि संकल्प वा मन नियंत्रित करणारी किंवा त्याला संमती देणारी बुद्धी तर एक फार महत्त्वपूर्ण सत्ता आहे. ही एक शिडी आहे ज्यावरून माणूस वर आकाशातही जाऊ शकतो आणि खाली पतनाच्या खड्ड्यातही उतरू शकतो-विनाशाच्या खाईत पडू शकतो. म्हणून बुद्धी ठीक ठेवणे अत्यावश्यक आहे. परंतु आज असे दिसून येते की जरी माणूस श्रेष्ठ विद्वान, वैज्ञानिक वा कलावंत झालेला असला तरी सदाचार व सद्भावनेच्या दृष्टीने तो मागासलेलाच आहे. तो अधिक तर्कशील व विचारशील झालेला आहे परंतु त्याच्या विचारांमधील सात्विकपणा मात्र कमी झाला आहे. त्याची बुद्धी भ्रष्ट झाल्याचा परिणाम हाच झाला आहे की आज देशोदेशी तंटे-बखेडे, कलह-क्लेश व अशांती यांनी थैमान घातले आहे आणि प्रत्येक माणसाचे मनही अशांत झालेले आहे.

तेव्हा आता प्रश्न उद्भवतो की, जर माणसाचे मन एखाद्या प्रलोभनामुळे किंवा खळबळीमुळे क्षुब्ध झाले तर ते बुद्धी चांगल्या विचारांद्वारे काबूत आणू शकते पण जर का बुद्धीच बिघडली तर ती कशी काय ठीक करावी ?

## बुद्धी सात्त्विक कशी होईल ?

बुद्धी सात्त्विक करण्यासाठी माणसाने सत्संगात जात राहावे असे सर्वच म्हणतात. सत्संगात चांगली वचने ऐकल्याने आणि परमपिता परमात्म्याच्या

स्मृतीत राहिल्याने माणसाची बुद्धी सत्वगुणी बनते. भांडी जशी राखेने साफ केली जातात, कपडे साबणाने धुतले जातात आणि शरीर पाण्याने स्वच्छ केले जाते तसेच बुद्धी पवित्र करण्याचे साधन म्हणजे ईश्वरी ज्ञान व सहज राजयोगच आहे. परंतु जेथे ईश्वरी ज्ञानाची चर्चा होते, खऱ्या योगाचे शिक्षण दिले जाते किंवा खऱ्या अर्थाने 'सत्संग' होतो अशा ठिकाणी जर कोणी गेला नाही तर त्याला सद्‌बुद्धी कशी मिळेल? सद्‌बुद्धी न मिळाल्याने तो आपल्या मनावर ताबा कसा ठेवू शकेल आणि मन ताब्यात न आल्याने त्याचे आचरण श्रेष्ठ कसे होऊ शकेल आणि आचरण श्रेष्ठ झाले नाही तर तो जीवनात सुख-शांती कशी प्राप्त करील?

## हास्यास्पद उत्तर

परंतु आज आम्ही लोकांस जेव्हा सांगतो की, "आपण रोज तास-अर्धातास वेळ काढून एक आठवडाभर आमच्या आध्यात्मिक ज्ञान-केंद्रात किंवा संग्रहालयात येऊन ईश्वरी ज्ञान ऐका व सहज राजयोगाचे शिक्षण घ्या", तेव्हा बहुतेक लोक टाळाटाळ करतात. त्यापैकी कित्येक लोक अशी मजेशीर उत्तरे देतात की, ती ऐकून फार हसू येते आणि त्या लोकांची कीव येते. नमुन्यादाखल दोन-तीन व्यक्तींनी दिलेली उत्तरे आम्ही येथे देत आहोत.

एका मातेला सांगण्यात आले की, "ईश्वरी ज्ञानाद्वारे जीवनात फार पवित्रता येते आणि बरीच शांती मिळते तर सहज राजयोगाद्वारे प्रभु-मिलनाचा आनंद मिळतो. म्हणून आपणास आमचे निमंत्रण आहे की, काही दिवस आमच्या सेवा-केंद्रात येऊन मानवी जीवनाचे लक्ष्य व जीवन सुखी करणाऱ्या पुरुषार्थाची रूपरेखा नीट समजून घ्या." त्यावर त्या श्रीमंत मातेने म्हटले, "हो, मनात तर येते की प्रभु-चर्चा ऐकावी, पण काय करू, परवाच तर माझी गाय व्याली आहे, तिच्या पाडसांची प्रकृती थोडी बिघडलेली आहे, तेव्हा आता काही दिवस तर मला येता येणार नाही."

असेच एका सद्‌गृहस्थांना आत्मा व परमात्म्याचा परिचय प्राप्त करण्यासाठी सहज ईश्वरी ज्ञान ऐकण्यास काही दिवस रोज सकाळी या असे निमंत्रण देण्यात आले तेव्हा ते बोलले, "सकाळी तर मी माझ्या मोती कुत्र्यास फिरावयास घेऊन जात असतो. सारा दिवस मी घराबाहेर असतो आणि घरात

मोती एकटा राहतो. हीच एक वेळ अशी आहे की तो माझ्याबरोबर राहून खुशीचा अनुभव करतो. म्हणून सकाळी मी येणे जरा कठीणच आहे आणि सारा दिवस वेळ तो कसा मला मिळतच नाही.

तिसऱ्या एका प्रतिष्ठित माणसाला जेव्हा आध्यात्मिक ज्ञानाद्वारें आपले जीवन दिव्य करण्याचा सल्ला देण्यात आला तेव्हा तो म्हणाला, "मी रात्री अकरा वाजता वर्तमानपत्र वाचता वाचता झोपून जातो आणि सकाळी उठताच चहाचा प्याला पिऊन जोपर्यंत वर्तमानपत्र वाचीत नाही तोपर्यंत आज माझ्याकडून काही खजिना हिरावून घेण्यात आला आहे असे वाटू लागते.याशिवाय जो काही वेळ आहे त्यापैकी बहुतेक वेळ ऑफिसातच जातो. ऑफिस व घर या घाण्याला बांधलेला मी जणू एक बैल आहे आणि असाच माझ्या जीवनाचा अंत होईल, यातच मी खुश आहे."

पाहा तर खरे कशी लोक उत्तरे देतात ते! विचार करण्याजोगी गोष्ट आहे की, जे लोक आपल्या बुद्धीच्या शुद्धीविषयी अथवा आपल्या आध्यात्मिक उन्नतीविषयी जरासुद्धा रुची दाखवीत नाहीत त्यांच्यासाठी काय करावे? त्यांची बुद्धी इतकी भ्रष्ट होऊन गेलेली आहे की त्यांना आपले हित व अहितही कळत नाही. ते एका घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे आपले जीवन व्यतीत करू इच्छितात. ते ईश्वरी ज्ञानाचे महत्त्व जाणत नाहीत, कदाचित त्यांना ते कठीण वाटत असावे यद्यपी ते फारच सोपे व सरळ आहे.

## ईश्वरी ज्ञान किती सोपे आहे?

आजकाल शाळेतील पाठ्यपुस्तकांची संख्या इतकी वाढली आहे की त्याचे ओझे कधी कधी तर ती नेणाऱ्या लहान लहान मुलांच्या वजनापेक्षाही जास्त असते. नोकरांच्या जवळ देऊन किंवा स्वतः कसे तरी ते ओझे सांभाळीत ही मुले शाळेत जातात. आता पाहा, इतकी पुस्तके ती मुले वाचतात परंतु जर त्यांना ईश्वरी ज्ञान प्राप्त करण्यास सांगितले तर त्यांचे आई-वडील म्हणतात की, "सध्या ती लहान आहेत, ईश्वरी ज्ञान समजू शकणार नाहीत." परंतु आपणच विचार करा की, स्वतःविषयी हे जाणणे की, "मी एक आत्मा आहे आणि परमात्म्याचे संतान आहे." ही काय मोठी गोष्ट आहे? जर मुलगा आपल्या दैहिक माता-पित्यांचे

नाम-धाम इत्यादी जाणतो आणि इतके सारे अभ्यासाचे विषय शिकतो, तर तो सर्व आत्म्यांचा परमपिता परमात्म्याचे नाम-धाम इत्यादी काय समजू शकणार नाही? स्वतः आपल्याला तसेच आपल्या पित्याला (परमात्म्याला) जाणणे यात कठीण काय आहे?

त्याचप्रमाणे मातांना ईश्वरी ज्ञान घेण्यास सांगितले तर त्या म्हणतात की, 'आम्ही तर अशिक्षित आहोत किंवा आता तर आम्ही वृद्ध झालो आहोत, आम्ही ईश्वरी ज्ञान कसे घेणार? परंतु आपल्या लक्षात असेल की मातांना नाती-गोती खूप आठवत असतात. त्यांनी कधी असे म्हणताना आपण ऐकले असाल की, "माझ्या धाकट्या जावेच्या काकीच्या सासूच्या भाचीच्या मुलांचे लग्न आहे." अशी गुंतागुंतीची नाती त्यांना जर आठवत असतात तर परमात्मा आमचा परमपिता, परमशिक्षक व परमसद्गुरू आहे हे इतके सरळ नाते आणि तोच आम्हास संपूर्ण पवित्रता, सुख व शांतीचा ईश्वरी जन्मसिद्ध अधिकार देतो इतकी साधी गोष्ट काय त्या समजू शकणार नाहीत?

वयोवृद्ध लोकांना आपण ईश्वरी ज्ञान घेण्यास सांगा तर ते म्हणतात की, "आता आम्ही काय ज्ञान शिकणार, म्हातारे पोपट काय कधी शिकतात? शिकावयाचे ते आम्ही शिकलो. आता आमच्या शिकण्याचा काळ तर निघून गेला आहे." परंतु आपण पाहिले असाल की हे म्हातारे आजोबा जेव्हा आपल्या नातवंडासमवेत असतात तेव्हा मोठ्या खुशीने त्यांना ऐकवत असतात की, जेव्हा आमचे आजोबा येथील पाटील होते तेव्हा गावात शेती भाती खूप होत होती. एकदा काय झालं की....नंतर असं झालं की...." अशाप्रकारे होऊन गेलेल्या, डोळ्यांनी बघितलेल्या किंवा ऐकलेल्या लांबलचक गोष्टी ते कथेच्या रूपाने सांगत असतात. त्यावेळी तास न तास बोलूनही ते थकत नाहीत. तर इतकेच जाणून घेणे की, 'सत्ययुगाच्या आरंभी या सृष्टीवर श्रीलक्ष्मी व श्रीनारायण यांचे दैवी स्वराज्य होते, तेव्हा तेथे संपूर्ण पवित्रता, सुख व शांती होती, नंतर त्रेतायुगात श्रीसीता व श्रीराम यांचे राज्य होते, द्वापर युगाच्या आरंभापासून भारत पतित होण्यास सुरुवात झाली.....' अशाप्रकारे आत्म्यांच्या जन्मांची चित्ताकर्षक कथा काय ते समजू शकणार नाहीत?

निःसंशय, आबालवृद्ध, स्त्री-पुरुष सर्वजण ईश्वरी ज्ञान शिकू शकतात आणि आपली बुद्धी पवित्र व दिव्य बनवून आपले जीवन महान करू शकतात व समाजात एक दिव्य क्रांती घडवू शकतात. परंतु सांप्रत त्यांची बुद्धी इतकी भ्रष्ट झालेली आहे की, या पुरुषार्थाचे महत्त्वच ते जाणत नाहीत आणि दुसरे म्हणजे ते ऐदी व ऐषआरामी बनलेले आहेत.

**'क्षणात प्रलय होईल, मग कराल कधी?'**

तसेच, आजच्या जगात शुभकार्ये लांबणीवर टाकण्याकडे लोकांची मनोवृत्ती झालेली आहे. कोणी म्हणतो की, मी तीन चार वर्षानंतर जेव्हा निवृत्त (Retired)होईन तेव्हा ईश्वरी ज्ञान प्राप्त करण्यासाठी वेळ देईन. दुसरा म्हणतो की शिवरात्री आता येणार आहे, तेव्हापासून मी पवित्र बनेन. अन्य कोणी म्हणतो की, माझा व्यापारच असा आहे की मला हिशेब ठेवण्यासच वेळ मिळत नाही. मी आता एक दोन वर्षात सारा व्याप ठाकठीक करून नंतर ईश्वरी ज्ञानाच्या प्राप्तीसाठी वेळ काढीन. परंतु माणसाला कोणत्याही वेळी मृत्यू येऊ शकतो याचा मात्र ते विचार करीत नाहीत. मृत्यूला कोणतेही, कधीही कारण होऊ शकते. माणूस निवृत्त झाला आहे का नाही, शिवरात्री आली का नाही किंवा शेठजीने हिशेब-ठिशेब केला आहे का नाही हे काही मृत्यू पाहत नाही, तो माणसाला जसा असेल तसा ताब्यात घेतो. म्हणून माणसाने परमपिता परमात्म्याचा परिचय प्राप्त करणे, आपली बुद्धी पवित्र व सात्विक बनविणे तसेच आत्मानुभूती करणे ही शुभ कार्ये उद्यावर ढकलता कामा नये. म्हटलेच आहे की, "कल करना सो आज कर, आज करना है सो अब, पल में परलय होयगी फिर करोगे कब?" (उद्या करावयाचे ते आज करा, आजचे ते आता करा, क्षणात प्रलय होईल मग कराल कधी?)

भक्तिमार्गाच्या लोकांत एक आख्यान प्रसिद्ध आहे. असे म्हणतात की, एक माणूस मृत्यूनंतर जेव्हा भगवंतापाशी गेला तेव्हा भगवंतांनी त्याला ठपका दिला की, "हे भक्ता, मी तुला तीन तारा पाठविल्या परंतु त्यांकडे तू दुर्लक्ष केलेस आणि एकाचेही उत्तर दिले नाहीस." भक्त म्हणाला, "भगवंता, माझ्याकडे तर कोणतीच तार आली नाही." भगवंत म्हणाले, "असे कसे म्हणतोस तू? तुझे केस

पांढरे झाले आहेत, ही पहिली तार पाठविली परंतु भगवंताचे बोलावणे येईल हे तुला कळले नाही. नंतर तुझे दात हलावयास लागले ही दुसरी तार होती त्यानंतर तुला ऐकावयास कमी येऊ लागले आणि डोळेही मंद झाले पण तरीही तू लक्ष दिले नाहीस. शेवटी मी तुला बोलावूनच घेतले!" आज तर माणूस म्हातारपण येण्यापूर्वीच मृत्यू पावतो. 'आला परवाना आणि झाला रवाना' कोणीही पूर्वी जाणत नाही. तेव्हा सांगावयाचे म्हणजे, कोणी जरी म्हाताराही होऊन मरेना, तरीसुद्धा ईश्वरी स्मृतीकडे पूर्वीच लक्ष द्यावे लागेल.

ग्राहक आणि मृत्यू कधी येईल हे सांगता येत नाही अशी एक म्हण आहे. एक माणूस खोलीच्याआत खोली, नंतर त्याही खोलीच्या आतील खोली अशा प्रकारे आठव्या खोलीत बसून राहिला आणि तेथेही त्याच्या रक्षणासाठी जागता पहारा ठेवला तरीही मृत्यू तेथे जाऊन त्याला आपल्या ताब्यात घेऊ शकतो. म्हणून माणसाने घरदार, धनदौलत, आप्तमित्र व तारुण्य यांपैकी कशाचा अभिमान न बाळगता प्रभुस्मृतीचे सर्वोत्तम कार्य उद्यावर ढकलता कामा नये. कारण उद्या आपण असू का नाही याचा काही भरवसा नाही आणि जरी असलो तरी आज आपल्याजवळ जी साधने आहेत ती उद्या आपल्याजवळ असतील वा नसतील. शुभ कार्य उद्यावर ढकलणे म्हणजे आलेले भाग्य परतवून लावणे होय.